# माणूस

३१ जानेवारी ७० चाळीस पैसे

तुमच्या आमच्या घरी शॉवर–बाथ नसेल
पण आलेवाडी खेड्यात मात्र तो आहे....



३१ जानेवारी १९७०

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष नववे : अंक पस्तीसावा

**संपादक : श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३०    दूरध्वनी : ५७३५९

किंमत : ४० पैसे    वार्षिक वर्गणी : वीस रुपये    परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

'माणूस' वाचनात आल्यापासून माझी एक सवय आहे की माणूसचा प्रत्येक अंक विकत घ्यायचा व चांगला असेल तर संग्रही ठेवायचा.

परंतु गेले संपूर्ण वर्ष आपण एकापेक्षा एक भिकार अंक काढून वैताग आणला होता. (अपवाद फक्त श्री. चंद्रशेखर यांची कलकत्ता दिनांक लेखमाला) परंतु माणूसची पूर्वीची कामगिरी पूर्ण लक्षात असल्याने, यांत्रिकपणे अंक वाचत होतो, आवर्जून वाचत होतो. कुठेतरी वाटत होते, की चंदू बोर्डेप्रमाणे माणूसही 'Bad patch' मधून जात आहे.


गेले चार अंक वाचून मात्र माणूसला आपला फॉर्म पुन्हा सापडला आहे असे दिसते! विशेषत: दादूमियाँ! हे लेख विशेष दर्जाचे आहेत. 'मार्ग' हे खास तुमचे सदर मला फार आवडते. कृपया आपण रेंगाळू नये.

**जानेवारी, २२**    **वामन कुलकर्णी, पुणे**

दि. २४ जानेवारी १९७० चा 'माणूस' साप्ताहिकाचा अंक बघितला. आणि बघितल्याबरोबर 'कव्हर' वाचून काढले. श्री. देवीदास बागूलांनी तेंडुलकरांचा जो परिचय करून दिला आहे तो फार परखड आणि प्रांजळ आहे. अजूनही लेखकाची फाजील स्तुती करण्याचा मोह आपल्या काही मराठी लेखकांना आवरत नाही. इतका की असा लेख वाचणं कंटाळवाणं होऊन बसतं. परंतु श्री. बागूलांनी तेंडुलकरांचा परिचय मोजक्या शब्दात नमुनेदारपणाने करून दिला आहे. आपणही तेंडुलकरांच्या परिचयाला ठळक स्थान देऊन त्यांच्या गौरवाची योग्य वूज राखलीत याबद्दल समाधान वाटते.

**जानेवारी, २२**    **नारायण प्रल्हाद आवटी, पुणे**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



# दिल्ली

## दिनांक २० जानेवारी

### सरकारी कॉंग्रेसला समस्यांचा 'घेराव'

सरकारी कॉंग्रेस सध्या अडचणींच्या 'घेराव'मध्ये सापडलेली दिसते. आणि कुठलीही अडचण आली की तिचा सामना करायच्या ऐवजी तिला बगल द्यायची हा जुन्या कॉंग्रेसचा जुना शिरस्ता नवीन कॉंग्रेसने न चुकता पाळलेला दिसतो. उदाहरणार्थ: नवीन कॉंग्रेसच्या कार्यकारिणीची बैठक गेल्या आठवड्यात दिल्लीत दिवसभर चालली, पण तिच्यात अपेक्षित अशा एकाही महत्त्वाच्या राजकीय प्रश्नाचा उहापोह झाला नाही. फक्त "मालमत्तेवरील मूलभूत अधिकार नष्ट करण्याचा आमचा विचार नाही व नव्हता; आम्ही असे काही करणार आहोत असा सिंडिकेट, जनसंघ आदी मंडळींनी दुष्ट अपप्रचार चालविला आहे." असे सरचिटणीस–द्वय शर्मा व बहुगुण यांच्या मार्फत आवर्जून जाहीर करण्यात आले. हा एक नकारात्मक प्रश्न सोडल्यास कार्यकारिणीने कुठल्या गोष्टींची चर्चा केली तर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न व गरिबांच्या घरांची समस्या.

प्रस्तुत बैठकीत अभावाने तळपलेला ज्वलंत प्रश्न अर्थात् चंदीगडचा. ही समस्या सरकारने सोडवायची आहे, सबब आपण तिच्यात लुडबूड करू नये असे मत मांडून सरकार चालविणाऱ्या पक्षाच्या या कार्यकारिणीने या धगधगत्या प्रश्नचिन्हाकडे सोयिस्करपणे पाठ फिरवली. सरकारने म्हणे या समस्येचे उत्तर तयार ठेवले आहे, व ते इंदिराजी जाहीर करणार आहेत. ते नक्की काय आहे हे मात्र आजच्या घटकेपर्यंत अत्यंत काळजीपूर्वक गुलदस्तात ठेवण्यात आले आहे. हा निर्णय खरे म्हणजे गेल्या आठवड्यातच जाहीर व्हायचा होता, पण पंजाबचे दडपण इतके जबरदस्त वाढले की दडपणाचा उपयोग होणार नाही हे दाखविण्यासाठीच म्हणे निर्णयाचा जाहीरनामा लांबणीवर टाकण्यात आला.

गेल्या आठवड्यात पंजाबच्या व हरियानाच्या शिष्टमंडळांनी दिल्लीत अगदी धुडगूस घातला होता हे मात्र खरे आहे. अखेर आपण अतिरेक करीत आहोत

याचो पंजाबी मुख्यमंत्री गुरनामसिंगांनाच जाणीव झाल्याने त्यांनी भेटीगाठीं अविरत सत्र आवरते घेतले व "या प्रकरणाचा शांततापूर्वक विचार करायलाचे केंद्राला आपण अवसर दिला पाहिजे." अशी स्वतःच कबुली दिली. चंदीगडचा प्रश्न हा शिखांच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे अशा अतिरेकी भावनेच्या उद्रेकात काही प्रमुख शीख नेत्यांनी राष्ट्रविरोधी विधाने करायलाही कमी केलेले नाही. या घातक उद्रेकाला बांध घालण्याचा प्रयत्न सरकारात शिखांचा भागीदार असलेला जनसंघ करीत आहे. चंदीगडचा प्रश्न फक्त शिखांचा नसून सर्व पंजाब्यांचा आहे अशी कलाटणी देण्यासाठी मंत्री असलेले व नसलेले पंजाब जनसंघाचे नेते मुख्यमंत्र्यांच्या बरोबर दिल्लीला येऊन गेले. पण विकारांच्या सागरात विचाराची नौका कितपत तग धरू शकते हे या वार्तापत्राच्या प्रकाशनाच्या आधीच स्पष्ट झालेले असेल.

सरकारी काँग्रेसपुढचे आणखी एक भिजत घोंगडे म्हणजे बिहार. बिहारमध्ये सध्या सरकारी काँग्रेस, विरोधी काँग्रेस आणि संसोपा अशा तीन घोड्यांची शर्यत चालू आहे व तिघांनाही वाटते आपण सरकार जिंकणार. सरकारी काँग्रेसचे नवनिर्वाचित बिहारी नेते दरोगाराय हे नुकतेच दिल्लीला येऊन इंदिराजींशी खलबत करून गेले तेव्हा मंत्रिमंडळ बनविण्याच्या बाबतीत इंदिराजींनी त्यांना हिरवा कंदील दाखविला. पत्रकारांशी बोलताना दरोगाजी म्हणाले, की आमच्या ७२ सभासदांच्या जोडीला सुमारे १०० बाहेरच्या विधानसभा-सदस्यांचा पाठिंबा मिळून आम्हाला सरकार स्थापन करता येईल. या शंभरात भाक्रांदपासून मार्क्सवादी साम्यवाद्यांपर्यंत सर्वांचा समावेश आहे. उलट संसोपीय नेते राजनारायण छातीठोकपणे सांगत आहेत की, संसोपाच्या नेतृत्वाखाली संयुक्त सरकार स्थापन होईल. याचे मुख्य कारण म्हणजे काही झाले तरी इंदिरा-पक्षीयांचे सरकार येऊ द्यायचे नाही असा निश्चय केलेल्या विरोधी काँग्रेसने संसोपाच्या खाली दुय्यम स्थान स्वीकारायची तयारी केली आहे. जनसंघाचा इंदिरा-विरोध तर प्रसिद्धच आहे. परंतु अखेर कोठल्याही पक्षाने सध्यापुरती बाजी मारली तरी त्यांचे सरकार थोड्या महिन्यापेक्षा अधिक काळ टिकू शकेल याची कोणालाच खात्री वाटत नाही. सरकारी काँग्रेसची संयुक्त आघाडी म्हणजे अठरा धान्यांचे कडबोळे ठरेल, तर विरोधी काँग्रेस-संसोपा इत्यादींचे संयुक्त विधायक दलदेखील अठरापगड राजकीय जातींचे मिळून होईल. तात्पर्य काय, कोठलेही सरकार स्थानापन्न झाले तरी बिहारमधला राजकीय गोंधळ सध्या तरी संपण्याची आशा नाही.

प्रकरण क्रमांक तीन उत्तर प्रदेश: उत्तर प्रदेशात इंदिरा आणि कंपनीने साखर कारखान्यांच्या राष्ट्रीयीकरणाचे ब्रह्मास्त्र सोडले खरे, पण गुप्ताजी डरलेले नाहीत. ते म्हणाले, सबंध देशातल्या साखर व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करीत असाल तर

माझीही तयारी आहे, पण भेदभाव चालणार नाही. इंदिराजींच्या उत्तर प्रदेश-भेटीच्या खर्चाचे प्रकरण गेल्या आठवड्यात बरेच गाजून इंदिराजी-गुप्ताजी पत्रापत्री इतकी झाली की या युद्धात अप्पा-इंदिरा युद्धातला फक्त मध्यरात्रीचा पत्रव्यवहारच काय तो कमी आहे असा सचित्र टोमणा येथल्या एका व्यंगचित्रकाराने मारला. गुप्ता सरकार उलथून पाडण्याचा इंदिराजींचा प्रयत्न हे राजधानीत एक उघड गुपित आहे, पण स्वत: इंदिराजी मात्र मला असे काहीही करायचे नाही असा निर्वाळा देत आहेत.

## मधोक-मिलाप

सरकारी काँग्रेसच्या कार्यकारिणीच्या बैठकीबरोबरच गेल्या आठवड्यात दिल्लीला जनसंघाच्या कार्यकारिणीचीही बैठक झाली. पक्ष निराळा, प्रश्नही निराळा. प्रस्तुत बैठकीचा मुख्य उद्देश पुन: उपस्थित झालेले मधोक प्रकरण निकालात काढणे हा होता. दोन दिवस काथ्याकूट होऊन अखेर दिलजमाई झालेली दिसते. मधोकांनी उपस्थित केलेले मुद्दे जुनेच होते तेव्हा त्यांची पुनरुक्ती करण्याची आवश्यकता नाही. पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे अखेर त्यांनी कबुलीजवाब दिला की, "आपल्या विधानांमुळे जनसंघाचे नेते निरनिराळ्या आवाजात बोलतात अशी जनतेची समजूत झाली असेल तर मला खेद वाटतो, व जनसंघाच्या धोरणावर टीका करणारी पुस्तिका आपण पाटणा अधिवेशनात वाटली ही चूक झाली." एकेकाळी मधोक जनसंघाच्या बाहेर जातात की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु त्यांना बाहेर घालविण्याची कुठल्याही जबाबदार जनसंघनेत्याची इच्छा नव्हती. उलट मधोक जनसंघाच्या बाहेर पडले तर त्यांचे राजकीय अस्तित्वच संपुष्टात येईल याची त्यांना स्वत:लाही जाणीव असावी. बैठकीतून बाहेर पडल्यावर पत्रकारांनी मधोकांना विचारले "आता सर्व अलबेल झाले ना?" तेव्हा ते म्हणाले, "अशी आशा करू या." मधोकांची भाषणप्रियता व त्यांचा एकंदर स्वभाव लक्षात घेता अनामिकही आशा करण्यापलीकडे जाऊ इच्छीत नाही.

या बैठकीत जनसंघाने चंदीगड प्रकरणी संत फत्तेसिंगांच्या आत्मदहनाच्या धमकीचा निषेध केला व त्यांनी ही अतिरेकी कल्पना सोडून द्यावी अशी मागणी केली. (अर्थात फत्तेसिंगांनी ती ताबडतोब धुडकावून लावली आहे.) केंद्रीय सरकारच्या अक्षम्य टोलवाटोलवीमुळेच पंजाब व हरियाना या दोन्ही प्रांतांच्या अपेक्षा इतक्या उंचावल्या की, आता परिस्थिती आटोक्याबाहेर गेली आहे असे वाजपेयींनी परखडपणे बोलून दाखविले.

— अनामिक

रातराणी

# नृत्याचे वेगळे जग

विजय तेंडुलकर


नृत्याचे एक वेगळेच जग असते.

या जगाचे विधाते आपल्या या व्यवहारी, रुक्ष, अस्ताव्यस्त जगातलेच एकेक नवे जुने परिचित तपशील घेतात आणि नृत्याच्या जगात ते अगदी नव्या, अद्‌भुत आणि डौलदार स्वरूपात मांडतात—पाहून वाटते, हे तेच का आपण आजवर पहात, ऐकत, वाचत आलो ते ?

या जगात काही म्हणून कुरूप नाही. येथली कुरूपताही डौलदार आणि मोहक असते. या जगात काहीच बेडौल नाही, बोजड नाही. एरवीचे बोजड ते येथे मूळ आकार कायम राखून कसे तरल आणि चपल होते. या जगात सारे काही शैशवात आणि यौवनात असते. गलितगात्र वृद्धत्व देखील लयीत पदन्यास करते. येथले दुष्ट लय–धुंद असतात, दैत्य आपल्या राक्षसी आकांक्षा वाद्यांच्या आणि गीतांच्या सुरेल साथीत नृत्य करून व्यक्त करतात, येथली वेदना लयीत बोलते, मृत्यू मुक्ती-सारखा सुंदर होऊन येतो. मग जे मुळात सुंदर आहेच, उदात्त आणि उन्नत आहेच, त्याची या जगातली शान तर विचारूच नका ! सौंदर्याचा अहर्निश ध्यास घेतलेले आणि लयीचा श्वासोच्छ्वास करणारे हे जग या व्यवहारी, रुक्ष, अस्ताव्यस्त, गुंतागुंतीच्या जीवनातले एक मोठे विश्रांतिस्थान म्हटले पाहिजे. त्यासाठी नृत्याच्या शास्त्रात फार शिरण्याची गरज नाही. शास्त्राचा कीस पाडण्याने उत्स्फूर्त आनंद बिचारा गुदमरतो. त्यापेक्षा एकादे लहान मूल जसे नव्या, उत्सुक, भुकेल्या दृष्टीने या जगातल्या छोटयामोठया गोष्टींकडे पहाते तशी दृष्टी ठेवावी, आणि नृत्याच्या ऱ्यापैकी कार्यक्रमाला जाऊन बसावे.

नुकता असा एक बऱ्यापैकी कार्यक्रम दिल्लीच्या नाटच इन्स्टिटयूट ऑफ कोरिओग्राफी नावाच्या संस्थेतर्फे मुंबईच्या भुलाभाई ऑडिटोरियममध्ये झाला. श्रीमती माया राव या नृत्यशिक्षण शाळेच्या प्रमुख आहेत. त्यांचा छात्रगण या कार्यक्रमात नृत्याचे प्रकार नाचला. माया राव कोण, दिल्लीची ही नाटच इन्स्टिटयूट कोठली, यातले काहीही आपल्याला ठाऊक नव्हते; अद्याप नाही. पण हा जीव ओतून नृत्य करणारा छात्रगण आणि विगेशी एका बाजूला वाद्यमेळात पुढेच स्थानापन्न होऊन या छात्रगणाच्या विभ्रमांनी नि पदन्यासांनी क्षणोक्षणी मोहरून दाद देत लयीत डोलणाऱ्या हेडबाई माया राव यांना आपण अद्याप विसरलेलो नाही.

पडदा वर गेला तशी समोर धूसर उजेडात एक शिल्प मांडले होते. अनेक मूर्तीचे परंपरागत शिल्प – राजा, राण्या, दासी वगैरे. वाटले की शेकडो वर्षापूर्वी हे शिल्प घडले. मागे मंद पार्श्वसंगीत चालू होते ते जणू उचलून आपल्यालाच त्या काळात अल्लद नेत होते, शतके बघता बघता ढगांच्या पुंजक्यांसारखी खाली गेली आणि आपण त्या प्राचीन इतिहासकालात थेट पोचलो – काय गंमत ! शिल्पे आता हलू लागली. भास वाटावा इतकी हळूवारपणे, अस्पष्ट. जणू गडद निद्रेतला भूतकाळ आळस देत जागा होत होता. मग शिल्पे उठून उभी राहिली. किती लयबद्धपणे, आपले शिल्पाकृतींचे अव्वल डौल कायम ठेवून. यातला राजा कोण ? म्हैसूरच्या प्राचीन इतिहासातला होयसाळवंशीय कोणी विष्णुवर्धन. बेलूरच्या मंदिरात म्हणे याच्या कारकीर्दीची शिल्पे आहेत. शिल्पांची आता मानवी रूपे होतात; पण प्राचीन इतिहासाशी अलंकारात, पोषाखात, अंगप्रत्यंगात नाते सांगणारी. विष्णुवर्धन दिग्विजयाला निघतो. राण्यांचा निरोप घेतो. पुत्र म्हणतो, तात, मला युद्धावर न्या. विष्णुवर्धन त्याची समजूत घालून त्याला मागे ठेवतो. सारे व्यवहारच पण एका लयीत विणले गेलेले. इतिहासाची उंची आणि डौल नर्तकांच्या अंगप्रत्यंगावाटे व्यक्त करणारे. धार्मिक विधीचे पावित्र्य आणि मनःपूर्वकता रंगमंचावरच्या प्रत्येक गोष्टीला बिलगलेली. विष्णुवर्धनाचा विजिगीषु उन्मेष, त्याचा प्रवास, त्याची युद्धे – युद्धे तर एका वेगळ्याच सौंदर्याने मुसमुसलेली. एक प्रकारचे मर्दानी सौंदर्य. पाशवी सौंदर्य. रक्तपिपासेतले उग्र सौंदर्य. रक्ताने न्हाऊन तेजाळ बनणारे रणातले सौंदर्य. एकेक घाव घणाघाती; तितकाच डौलदार, देखणा, एकाद्या कसबी चित्रकाराने फलकावर आवेगाने रेष ओढावी वा कुंचला फिरवावा तसा जिवंत ! युद्ध येथे सुंदर बनले होते. रानटी पशुता नेत्रसुख देत होती. विष्णुवर्धन लढाया जिंकून परत येतो. शिंगे तुताऱ्या वाजतात. मंगल घोष चालतात. राण्या त्याचे नृत्यगायनाने आगत स्वागत आणि श्रमपरिहार करतात. पुन्हा साऱ्या आकृत्या बेलूर देवालयातली प्राचीन शिल्पे बनल्या. निश्चल. विलक्षण डौलदार. इतिहासाकडून पहाता पहाता पार्श्वसंगीताने आपल्याला वर्तमानात अल्लद वाहून आणले आणि पडदा केव्हा आला ते कळले नाही.



होयसाळ नृत्यनाट्यातील एक दृश्य

तसे पाहिले तर एका मोठ्या इतिहासातले हे केवळ एक पान. हा इतिहासही महाराष्ट्राचा नव्हे; म्हैसूरचा–पण हे दूरचे डोंगर या नृत्याने इतके निकट आणून दाखविले आणि तेही इतक्या अद्भुत, देखण्या मंतरून टाकणाऱ्या दिव्य भव्य स्वरूपात की कोणी एक विष्णुवर्धन, त्याच्या राण्या, त्याचे दिग्विजय यापलीकडे नृत्यातल्या दृश्य सौंदर्याचा, आणि एका डौलदार लयबद्ध उसळत्या मुसमुसत्या गतिमान भव्यतेचाच प्रत्यय मनात उमटून पाण्यावरच्या उन्हासारखा किती वेळ तरी हिंदकळत राहिला.

नंतर मग झाले भीमगर्वहरणाचे नृत्य. हा मात्र आपल्या ओळखीचा प्रसंग. जेहत्ते कालाचे ठायी हनुमानजी वाटेत शेपटी आडवी टाकून बसले होते आणि गर्वोद्धत भीमसेन कुबेराच्या उद्यानाच्या मार्गावर तेथे येऊन पोचले. महाराज हनुमान वाटेत असे बसल्याचे पाहून ते गदा सावरीत ओरडले, ए माकडा, चल दूर हट. पण हनुमंत तसेच. भीमसेनांनी दरसा दिला, इशारा दिला, पण हनुमंताला धीम्म नाही. मग मात्र भीमसेन फार क्रुद्ध झाले. त्यांनी हनुमंताच्या शेपटीवर एक लाथ घातली आणि शेपटीऐवजी पायालाच झिणझिण्या आल्या आणि भीमाच्या नजरेपुढे काजवे चमकले. पण अहंकार तो अहंकार! भीम म्हणाला, काय टुरटुर लावली आहे या धुंगुरट्याने? भीमाने सरळ शेपटीला हात घातला; तर एका हाताने भागेना. दोन हात लावले; तरी भागेना. मग दंडांना टारून बेटकुळ्या

विटकुळ्या काढून, दातओठ खाऊन भीम शेपटीला झटला पण शेपटी जडच. भीमाला धाप लागली. हनुमान निवांत आणि गरीब चेहऱ्याने बसलेला—शेवटी भीमचे पुरते गर्वहरण झाले आणि तो हनुमंताला शरण गेला—हीच गोष्ट. रंगमंचावर प्रथम दिसला हनुमंत; रंगीत लांब लांब केसांचा बेढब पोषाख करून त्यावर लाल जांघिया घातलेला. मुगुटविगुट, हुप्पे तोंड. पण प्रत्येक हालचाल लयबद्ध, प्रमाणबद्ध. वरवरच्या सुस्त बेंगरूळपणाआड हळूहळू एक डौल जाणवू लागला. मग भीमराव गदा गरगरा फिरवीत आले. चलाख. आक्रमक. अहंमन्य. प्रत्येक पावलात ओतप्रोत दर्प, आणि नंतर क्रमशः त्यांची फटफजिती. बलदंड, चलाख भीम विरुद्ध बेंगरूळ हनुमानाची फक्त शेपटी. अपूर्व सामना. शेपटी जिंकली, भीम पार हरला. भीमाचे थैमान आणि आधीचे विष्णुवर्धनाचे विजय-नृत्य यात केवढी तफावत, केवढी अर्थपूर्ण तफावत ! पहिला अहंकार तर दुसरा पुरुषार्थ. हनुमानाच्या बेंगरूळ सोंगातही केवढी लय भरलेली आणि केवढा डौल राखलेला.

वाटले की या प्रसंगाचे समजा नाटक कोणी लिहिले असते तर संवादात कधीच येऊ शकली नसती अशी गंमत या नृत्यात दोनच नर्तकांच्या खुबीदार, हिशेबी, अर्थवाचक, लयबद्ध हावभावांनी आली. वाटले की शब्दांबाहेर फुलत जाणारे हे नाटक होते आणि याचे खटकेबाज संवाद पात्रे अंगप्रत्यंगातून नृत्याच्या विन-


# शिलंगणाचं सोनं

आवृत्ती : तिसरी

ब. मो. पुरंदरे

किमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन

शब्दांच्या भाषेत सुरेख बोलली. सारा प्रेक्षकवर्ग क्षणोक्षणी दाद देत होता तो काय उगीच ?

मग लक्षात आले की या बिनशब्दांच्या भाषेला पार्श्वसंगीत, इफेक्ट्स, प्रकाशयोजना या तांत्रिक अंगांची जोडही राववाईनी कल्पकतेने, मोजकेपणे दिली होती; तिचाही काही प्रभाव होता. कोणीतरी कोणाला तरी म्हणाले, नृत्याचे विविध पंथ एकत्र आणून एक व्यापक असे भारतीय नृत्य बनविण्याच्या दृष्टीने हा प्रयोग वेधक आहे. उदाहरणार्थ, पहिल्या होयसाळ वैभवमध्ये म्हैसूर शैलीच्या भरतनाट्यम्‌बरोबर मणिपुरी आणि कथ्थक मोठ्या जाणकारीने वापरले होते.

काही का असेना, एवढे खरे की मणिपुरी आणि कथ्थक न कळणाऱ्यालाही राववाईनी खुर्चीत खिळवून बसवून काहीतरी आनंददायक पाहिल्याचे समाधान दिले होते, जे नाटकात मिळणार नाही, संगीतातही गवसणार नाही, कथा कादंबऱ्यात पुरते येऊ शकणार नाही असे काही या नृत्य माध्यमात होते.

नंतर या कार्यक्रमात तराण्यावरचे एक नृत्य झाले आणि भारत-चीन युद्धावरचे 'जवान' नावाचे दीर्घ नृत्य-नाट्य झाले. विष्णु वर्धनाच्या खड्गांच्या हातघाईच्या लढाया तर या आधुनिक लढाया बंदुका आणि ग्रेनेडसच्या पल्लेदार खड्गांच्या हातघाईचा डौल बंदुकांचे चाप ओढण्याला कसा यावा ? पण आता चिनी मकाव तर क्षणात भारतीय सैनिक बनून रंगमंचावरून आतबाहेर धावत, ग्रेनेडस फेकीत, बंदुका चालवीत राववाईंच्या गुणी छात्रांनी केलेली कमालीची शिस्तबद्ध आणि नृत्यबद्ध धमाल प्रेक्षणीय होती. प्राचीन इतिहासातल्या शिल्पांची उंची किंवा पुराणातल्या प्रसंगांची अद्‌भुत लज्जत मात्र या नृत्याला आली नाही; हे आपले वर्तमानपत्री किंवा डॉक्युमेंटरी चित्रपटातून घेतल्यासारखे वाटले. फार फार तर हिंदी चित्रपटातून.

पण तरी काय झाले ? या नृत्याच्या वेळी विंगेत संगीत साथीच्या मागे एक टिल्लू एकटाच तन्मयतेने रंगमंचावरचे नृत्य बघत उभा होता. नृत्य पथकातल्या कुणाचा तरी तो असावा. इतका रंगून तो बेटा हे वीरश्रीयुक्त धमाल 'जवान' नृत्य पहात होता नि जगत होता की संगीताच्या लयीत, नर्तकांच्या बरोबर त्याचा कोवळा कोवळा, तल्लीन, रोमांचित चेहरा एकसारखा हलत होता, बोटे स्फुरत होती, जागच्या जागी चिमुकले पाय नाचत होते आणि छोटे छोटे विस्फारले डोळे असे चमकत होते, असे चमकत होते की काही वेळ रंगमंचावर तेवढेच नाचताहेत असे वाटले.

—खरे सांगतो. आपण तेवढा वेळ हेच विंगेतले जागच्या जागी चाललेले अफलातून नृत्य पाहिले—छोटा जवान नृत्य—उद्याचा उदय शंकर नाहीतर गोपीकृष्ण ते मनोमन सर्वस्वाने नाचत होता.

□ □ □

३१ जानेवारी १९७०



गावातील स्त्रिया श्रमदानाला निघाल्या.

# आलेवाडी

नुकतेच काही पत्रकार या गावी गेले होते. अकोटचे श्री. शांताराम सरदेशपांडे यांनी धाडलेला हा धावता वृत्तांत...


अकोट—अकोला मर्गावरील देवरी फाटयाजवळ अकोटपासुन अवघ्या ८–१० मैलांवर आलेवाडी हे ५४२ लोकसंख्या असलेले एक खेडे. गाव रस्त्याला लागून असल्यामुळे उतरल्याबरोबर खेड्यात प्रवेश करण्यासाठी प्रवेशमार्ग दिसतो. हा मार्ग अगदी चांगला पक्का आहे. रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली तीही झाडांसाठी असणाऱ्या खास कुंपणाच्या वेष्टनात; दोन्ही बाजूला पांढरे दगड ठेवले आहेत आणि काही यार्ड चालून जातो न जातो तोच छोटीशी, सुबक आणि स्वच्छ शाळची इमारत दिसते. बापूजींचा अर्ध पुतळा शाळेच्या उद्यानात दिसतो आणि त्याभोवती विटांच्या साहाय्याने कोरून केलेली कोरीव लेणी मन मोहवून टाकतात.

आम्ही गावात पोहचत असतानाच पांढरा नेहरू शर्ट, काचा मारलेले धोतर परिधान केलेली एक रुबाबदार व्यक्ती आमच्या स्वागतास सामोरी येते व 'मी भीमराव वानखडे, या

गावचा सरपंच ' अशी आपली ओळख करून देते. अकोटच्या विकास अधिकाऱ्यांनी या व्यक्तीबद्दल खूपखूप सांगितले असते आणि म्हणून त्यांना भेटावयाची उत्कंठा लागली असते. त्यांचा भारदस्तपणा व नम्रता पाहून आम्ही पहिल्या भेटीतच मोहून जातो.

चालता चालता ते ह्या रस्त्याबद्दल सांगू लागतात–" प्रथम हा रस्ताच नव्हता, सगळ्या गोरगरिबांच्या झोपड्या होत्या येथे. एक दिवस सगळ्यांनी एकत्र जमून ही अतिक्रमणे हटविण्याचा विचार केला आणि तो तडकाफडकी अमलात आणला. ज्यांची घरे रस्त्यावर होती त्यांना बाजूला जागा देण्यात आली. काही लोकांची कमी जास्त जागा गेली त्याबद्दलदेखील त्यांनी कुरकुर केली नाही."

ते म्हणाले, " १९५६-५७ पासून आमच्या गावात ग्रामपंचायत आहे; पण ग्रामपंचायतीच्या कधीही निवडणुकी झालेल्या नाहीत. फार कशाला, आमच्या गावात कधी तंटाबखेडा किंवा मारामारीदेखील झालेली नाही." यामुळे साहजिकच उत्सुकतेने श्री. भीमराव वानखडे यांना विचारले–' काहो, याचा अर्थ आपल्या गावात कोण-



गिरणीसमोर मंडळी उभी आहेत. कोट घातलेले 'नवा समाज' साप्ताहिकाचे संपादक श्री. अच्युतराव देशपांडे, शजारी पत्रकार श्री. शांताराम सरदेशपांडे आणि त्यांच्या बाजूस सरपंच भीमरावजी वानखडे.

काही राजकीय पक्ष नाही असा होतो काय ?' यावर ते म्हणाले, ' आमच्या गावात सगळे पक्ष आहेत, सगळ्या विचारप्रणालीचे लोक आहेत. इतकेच काय सिंडिकेट, इंडिकेटदेखील आहे. परंतु गावचे काम म्हटले की मग तेथे सगळे एक, तेथे पक्ष नाही, पंथ नाही आणि जातभेददेखील नाहीत.'

चालत चालत भीमरावांच्या बैठकीवर आलो. तेथे गावकरी मंडळी जमली होती. रामराम झाल्यावर प्रथम गावात चक्कर मारून यावयाचे ठरले.

गावात जरी लहानमोठी घरे असली तरी प्रत्येक घरास संडासची व्यवस्था आहे, एकूण ८९ संडास आहेत. सर्व खतोत्पादक आहेत.

प्रत्येक कुटुंबासाठी निर्भंगी व खतोत्पादक संडास असलेले भारतातील हे पहिलेच खेडे बहुधा असावे.

प्रत्येक घरासमोर सडासंमार्जन करून रांगोळी काढलेली दिसत होती. आश्चर्याची गोष्ट म्हणजे प्रत्येक घरासमोर पक्की नाली बांधण्यात आलेली दिसली. ग्रामपंचायतीने स्वतःच्या खर्चाने सर्व पक्क्या नाल्या बांधल्याचे नंतर समजले.

सहजच एक बंद असलेला नळ पाहून त्यांना विचारले, " या गावात लोकांना नदीचेच पाणी प्यावे लागत असेल नाही?" यावर श्री. भीमराव म्हणाले, "आमचा भाग हा खाऱ्या पाण्याच्या क्षेत्रात आहे, नदीला बाराही महिने पाणी नसते म्हणून आमच्या ग्रामपंचायतीने १९६१ मध्ये ह्या विहिरीवर स्वतःचे इंजिन बसविले व खेड्यातील प्रत्येक घरास नळ दिला आणि तो आजतागायत चालू आहे."

पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीतून एका मोठ्या पंपाद्वारे गावातील एका उंच ठिकाणी रिझवायर म्हणजे पाण्याच्या टाकीत पाणी आणून तेथून सर्व नळांना पाणी देण्यात येते. आणि त्या टाकीखालीच ग्रामपचायतीने सुंदर, सुबक आणि स्वच्छ असे सार्वजनिक स्नानघर तयार केले असून तेथे आकर्षक असा शॉवर बाथ बसविला आहे. ही खास गावात येणाऱ्या पै-पाहुण्यांसाठी सोय असल्याचे त्यांनी सांगितले.

## आमच्या गावात कोणीच बेकार नाही

बोलण्याच्या ओघात भीमरावजी पुढे म्हणाले की, आमच्या गावात कोणीच बेकार नाही. शेतकऱ्यांना तर त्यांच्या शेतावर बाराही महिने काम असते. पण शेतमजूरांना देखील असते. जव्हा पावसाळ्यात काही कामे नसतात तेव्हा शेतमजुरांसाठी मुद्दाम कामे काढण्यात येतात.

गावात २ महारोगी, ३ आंधळे व ३ वृद्ध आहेत. त्यांना दर आठवड्यास ३ किलो पीठ ग्रामपंचायतीच्या मालकीच्या चक्कीवरून देण्यात येते. ही चक्की पाणी पुरवठ्यासाठी बसविण्यात आलेल्या इंजिनवर चालविण्यात येते.

या गांधीजन्मशताब्दी समारोहात जिल्हा पातळीवर आदर्श गावासाठी जी स्पर्धा होणार आहे त्यात ह्या खेड्याने भाग घेतला आहे. याशिवाय श्री. दादाराव मारोती

वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसेवा सहकारी सोसायटी, पीक संरक्षण समिती वगैरे समित्या गावात काम करीत आहेत. हे गाव नशामुक्त आहे. तसेच परिवार नियोजन ग्रामदेखील आहे. या गावात रामकोठी आहे.

## अगा जे पाहिलेचि नाही

गांधी जन्मशताब्दी सामारोहानिमित्त आलेवाडी गावातील सर्व हरिजन भगिनींनी २ आक्टोबर रोजी स्वयंपाक केला व सवर्ग हिंदूंसह सर्व जण याच गावात एके ठिकाणी मांडीला मांडी लावून बसले व जेवले.

□ □ □

## संशोधन मंदिरातून

गेल्या काही महिन्यात भारतातील संशोधन मंदिरातून काही उत्साहजनक बातम्या हातात आल्या आहेत. त्यापैकी प्रमुख बातमी म्हैसूरच्या केंद्रीय खाद्य पदार्थ संशोधन केंद्रातील आहे. आत्तापर्यंत टोंड दुधाची पावडर परदेशातून आयात करावी लागत होती. या संस्थेने टोंड दुधाची पावडर भारतीय सामुग्रीपासून भारतात बनविण्याची एक पद्धत शोधून काढली आहे. भुईमुगाच्या शेंगामधील प्राणिज पदार्थ, ग्लुकोज व काही खनिज पदार्थ वापरून ही पावडर बनवलेली आहे. चव व दर्जा याबाबत ही पावडर कोणत्याही आयात केलेल्या पावडरपेक्षा सरस आहे. या पावडरपासून बनविलेले टोंड दूध आज बंगलोर शहरात काही ठिकाणी वाटले जाते. मोठ्या प्रमाणावर या पावडरचे उत्पादन करण्याचे तंत्र विकसित करण्याचे काम सध्या बंगलोरच्या सरकारी दूधशाळेने आपल्या अंगावर घेतले आहे. हे काम पुरे झाले की, भारतातील सर्व प्रमुख शहरात भारतीय टोंड दूध मिळू शकेल.

कलकत्याच्या केंद्रीय काच संशोधन विभागाने पण एक नवा शोध सादर केला आहे. मायक्रोफोन, टेलिफोन, फोनोग्राम या व इतर अनेक विद्युत उपकरणांसाठी 'बेरियम टायटेनेट' लागते. आजपर्यंत या पदार्थासाठी आपण परदेशावर अवलंबून होतो. पण काचेचे विद्युत पृथक्करण करून हा पदार्थ मिळवण्याची सुरुवात आता कलकत्याच्या संशोधन केंद्रात झाली आहे. या एका छोट्या संशोधनामुळे अनेक कोटी रुपयांचे परकीय चलन पुढील काही वर्षात वाचू शकेल.

# मुंबई अधिवेशन....

## ह्यांना असे वाटते !

अनिल बर्वे

पुणे-मुंबई रस्त्यावर मध्यरात्रीच्या धुरकटलेल्या अंधारात फिकट उजेडाच मागोवा घेत बोरिवलीच्या हनीफ ड्रायव्हरची प्रायव्हेट टॅक्सी तळोजाला विसावली. तळोजाची ती विख्यात बिर्याणी खाता खाता मी हनीफला सावधपणे विचारले–

घेडगुजरी हिन्दीला विलक्षण धार आली. जिवंतपणा आला. उद्वेग, संताप, चीड त्याच्या बोलण्यातून आकार घेऊ लागली.

" साब, मालदार मालदारको सपोर्ट देगा। गरीबोंको कौन पूछनेवाला है।" तो अखंड बोलत होता. गाडी वेग घेत होती. गिअर्स बदलत होते. मध्येच कचकन् ब्रेक दाबले जात होते. एखादा खड्डाही येई – खराब रस्ता – 'जापानी रास्ता' त्याची परिभाषा.

" यह काँग्रेसके सब झगडे बेकार है। सब आपआपने घर भरते है। यशवंतराव, मोरारजी सब बंगलेवाले कंसे हुए। महगाई बढाकर, गरिबोंका खून चूसकर।"

त्याला मी थोडेसे थंड होऊ दिले. विचारलं – ' हनीफ, हमने तो सुना है भाई, तुम लोगोंको कर्जा मिलता है। '

" हाँ हाँ, आ – कर्जा देते है तो कौनसा बडा तीर मारते है ? आखीर पब्लीकका तो ही पैसा है। फिरभी, रुपयेमें पाँच पैसा भी हमें नही देते। "–हनीफ

त्याच्या प्रतिक्रियेने मी सर्दच झालो. म्हणजे टॅक्सीवाल्यांचा ह्या इंडिकेटला पाठिंबा या थापा वाटते !



"बरं हनीफ, ह्या जातीय दंगली कोण घडवतो ! तुला कोण वाटतो ?" मी विचारले.

"साब, लोकं अन्नाला मोताद झालेत. इथे कुणाला सुरामारीची हौस ! ये बडे लिडर लोग – स्वतःच्या थैल्या भरण्याकरिता देतात काडी लावून. पब्लीकभी चुत्या है. त्यांनाही येते 'सनक' कुत्तोंको जसे लडते है।" हनीफ बोलत होता – मनापासून. "ये सब बेईमान लिडर को जेलमे डालकर उनका खाना बंद करना चाहिये – साब, इधर पाकिस्तानका राज चाहिये.

गाडी खड्ड्यातून चालली होती. मी विचारले 'क्यो ?'

"उधर 'पब्लीक' का राज है. जिधर पब्लीकका 'राज' होता है वहांकी जिंदगी भी बहतर होती है।"

हनीफचो 'शवरलेट' बोरिवलीला थांबली. म' ट्रेन पकडली.

कोणा देशभक्ताला हनीफ 'देशद्रोही' वाटेल पण मलाच फक्त माहीत आहे की तो देशद्रोही नाही. धर्म-वंश-जात-वर्ण या पलीकडचे त्याचे विचार आहेत. त्याला मुसलमानांचं नको – 'पब्लीक'चं राज्य हवंय. पाकिस्तानात ते आहे अशी त्याची ठाम कल्पना आहे.

एक भिकाऱ्याचे पोर केळीचे साल चावत खात होते. खरच भुकेल्या पोटी अन्नातील 'व्हिटॅमिन्स' कोण पाहणार !

"साब खाना नही मिलेगा तो छूरा-चाकू चलाना पडता है।" अंतर्मनात हनीफ ओरडत होता. 'गरिबोंको जीना मुष्कील करके इन्होनेही गुंडा बनाया।'

¤

छोटा व्यापारी हा तालुका-लहान गावे-येथे फार मोठे वर्चस्व आणि प्रतिष्ठा राखून आहे. स्थानिक राजकारणात ह्या वर्गाचा फार मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. ह्या छोटया व्यापाऱ्यांच्या प्रतिक्रिया समजावून घेण्याकरिता मी बऱ्याच मुलाखती घेतल्या. त्यापैकी एक एस. एस. कामत – उल्हास रेस्टॉरंट – देवतलाव ह्यांची. ते म्हणाले, "जनसेवा करायला या पुढाऱ्यांना सत्ताच कशाला हवी? गांधी-टिळकांकडे काय सत्ता होती ?"

"नेहरूंच्या मृत्यूनंतर देशाची बेवारशी परिस्थिती झाली आहे. सिंडीकेटवाले चोर आहेत. आजपर्यंत त्यांनी काय देशाचे भले केले आहे ? इंडिकेटचे पुढारी-सुद्धा हेकेखोर आहेत. परतु इंडिकेटमधील मंडळी तरुण आणि होतकरू असल्यामुळे बुद्धीची व प्रामाणिकपणाची जोड मिळण्यास अजून चांगले दिवस येतील."

¤

तीक्ष्ण घ्राणेंद्रियाचा 'माणूस' भायखाळ्याच्या मार्केटातून सामान्य जनतेच्या प्रतिक्रिया समजावून घेण्याकरिता हिंडतोय – जनता – सोळा कोटी जनता रोजी सतरा पैसे कमावते. विद्वान वाद घालतात – नाही, तीस पैसे कमावते ! पाच कोटी जनता अश्मयुगात वावरते – नागडी-उघडी हिंडते. कोणी म्हणते, ते 'जंगलचे राजे' आहेत. जनता – शरीर विकणारी जनता, श्रम विकणारी जनता, मन विकणारी जनता, बुद्धी विकणारी जनता, लक्तरं नेसणारी जनता, अन्नान्न जनता–

ही अधिवेशने हिच्याकरिता, हे गट, हे तत्त्वज्ञानाचे ग्रंथ, हे थिसीस – अॅन्थेथिसीस, राष्ट्रवाद–देशभक्ती – सारं सारं ह्या जनतेकरिता !

"राजकीय मरगळ आलेली ही जनता. पण तिलाही स्वतःची अशी सहनशक्ती आहे. परिस्थितीच्या दबावाने ही सहनशक्ती संपुष्टात येईल आणि मग 'अशाश्वततेच्या समशेरीवर शाश्वनाच्याही तुटतील ढाली.' ही जनता – अर्ध-नग्न, अर्धपोटी जनता प्रचंड उत्पात घडवेल. मग कोणी त्या उत्पातास श्रमजीवी वर्गाची

[ पृष्ठ ५६ वर ]

# बादशहाखान आणि हिंदू-मुस्लीम प्रश्न

## हिदायत खान

इंडिकेट-सिंडिकेट यांच्यामध्ये चालू असलेल्या भांडणात सामान्य माणसाची अवस्था चक्क लक्ष्मणच्या व्यंगचित्रातील 'कॉमन मॅन'सारखी झाली आहे...दोन्हीकडून घोषणांची आतषबाजी चालू आहे. त्या घोषणांनी तो क्वचित दिपून गेल्यासारखा दिसत असला तरी एकूण तसा तो निर्विकार-पणेच सारं पाहतो आहे कारण गेल्या बावीस वर्षांत तो नाही म्हटलं तरी बरंच काही शिकला आहे...तरीही QUIT POVERTY, WORK AND WIN यांसारख्या गोंडस नि गोडगोड घोषवाक्यांची त्याला भुरळही पडते आहे. त्याच्या डोळ्यात मधूनच आशेची चमक तरळते आहे. उभयतांकडून एकमेकांवर केल्या जाणाऱ्या आरोप-प्रत्यारोपांनी तो क्वचित भांबावून जातो आहे. खऱ्याखोट्याचा निवाडा करताना त्याची तारांबळ उडते आहे.

सारांश, तो काहीसा भ्रांतचित्त झाला आहे.

अशा वेळी त्याच्या कानी एक भरदस्त आवाज पडतो आहे. त्या आवाजातून उमटणारी आंतरिक तळमळ विचारप्रवृत्त करते आहे. त्या वक्तव्यात वक्तृत्वाची धार नसेलही कदाचित; परंतु त्यातील मनस्वी परखडपणा नि प्रामाणिकपणा थेट अंतःकरणाला जाऊन भिडतो आहे. मनोमन पटतो आहे... 'अरे, खरंच की. हे असंच असावं बहुधा.' या अर्थी तो मान डोलवतो आहे.

भारतात पाऊल ठेवल्यापासून खान अब्दुल गफारखान यांनी केलेल्या प्रत्येक भाषणामधून एक गोष्ट सातत्याने नि प्रकर्षाने जाणवते आहे, व ती म्हणजे निर्भिड नि निर्भय परखडपणा. निखळ, निर्मळ नि क्वचित नागडेही सत्य बोलण्याचा निडर-पणा. इंडिकेट नि सिंडिकेट यांच्यातील भांडणाचे सत्यस्वरूप बिनदिक्कतपणे सामान्य जनतेपुढे मांडण्याचा प्रामाणिकपणा. निस्पृह नेता किती निर्भय असू शकतो, निरं-कुश राहू शकतो, निर्मळ सत्य बोलू शकतो याचा मूर्तिमंत पुरावा म्हणजे खान अब्दुल गफारखान !

अर्थात मला इथे इंडिकेट-सिंडिकेट वादात पडायचं नाही. गफारखानांचा हा परखडपणा आणखी एका महत्त्वाच्या प्रश्नाबाबत कसा फलदायी ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे-निदान मला तरी तसे वाटते-त्याविषयीच प्रामुख्याने काही सांगा-यचं आहे.

हिंदु–मुस्लिम प्रश्नासंबंधी आजवर अनेकांनी अनेक प्रकारे मीमांसा केलेली आहे. उपाययोजनाही सुचवलेली आहे. परंतु दुर्दैवाने त्याचा दृश्य असा परिणाम अद्याप तरी दृष्टिपथात नाही. कदाचित मुळात निदानच चुकल्यामुळे योजण्यात आलेले उपचार फोल ठरले असतील किंवा निदान बरोबर होऊनही परिणामकारक अशी उपाययोजनाच झाली नसेल, किंवा योग्य उपाययोजना होऊनही प्रत्यक्ष पथ्य पाळण्याबाबत हलगर्जीपणा झाला असेल...कारण काही असो. पण नुकतेच अहमदाबाद येथे झालेले भयंकर हत्याकांड हे हिंदू–मुस्लीम संबध सुधारल्याचे चिन्ह खासच नव्हे !

पुण्यात गफारखान आले असताना विविध पक्षनेते, कार्यकर्ते आदींबरोबर झालेल्या अनौपचारिक चर्चेत त्यांनी या गंभीर समस्येसंबंधी जे मूलग्राही विवेचन केले त्यातील नवीनता जशी नाकारता येणार नाही तशीच त्याची परिणामकारकताही दृष्टिआड करता येणार नाही. निदान मला तरी तशी ती करावीशी वाटत नाही. कारण या चर्चेच्या वेळी गफारखानांच्या वक्तव्याचा उपस्थित मुस्लिमांवर काही अंशाने तरी परिणाम झाल्यासारखे मला दिसले आणि ही बाब मला फार महत्त्वाची वाटते. खरं तर मुस्लीमांना एखादी गोष्ट पटवणे महा कर्मकठीण. त्यातून इस्लामसारखा नाजुक प्रश्न...पण–सोनाराने कान टोचण्यासारखा प्रकार असेल, निषेध वा बहिष्कार या सुप्रसिद्ध अस्त्रांचा अवलंब न करता गफारखानांचे विचार मुस्लीमांनी निमूटपणे ऐकून घेतले...ते बव्हंशी त्यांना पटल्यासारखेही जाणवले. तुम्ही म्हणाल त्या उपस्थितात पुरोगामी तरुणांचाच भरणा असेल म्हणून हे घडले असेल...पण वस्तुस्थिती तशी नाही. दोन्ही होते. कट्टर नि कर्मठ होते तसेच पुरोगामी ' यंगटर्कही ' होते.

मुस्लीमांच्या विशेष जिव्हाळ्याच्या अशा द्विभार्या प्रतिबंधक कायद्यासंबंधीच्या एका प्रश्नानेच चर्चेला सुरुवात झाली.

गफारखानांनी सांगितले की, कायद्यावर बोलायला मी कोणी कायदेतज्ञ नाही. तथापि कुराणाचा मला जो अर्थ कळला आहे त्याआधारे मी एवढं सांगू शकेन की, मुसलमानाने एकाहून अधिक बायका कराव्यात असा आदेश दिलेला मला तरी आढळलेला नाही. चार बायका करण्याची सवलत मात्र त्यात आहे. अर्थात ती सवलत बहाल करण्यामागेही विलास वा चैनीपेक्षा तत्कालीन परिस्थितीची गरजच आहे. युद्धात धारातीर्थी पडलेल्या पुरुषांच्या विधवांना आधार देण्याचा त्यामागे सद्हेतू होता...तथापि पहिल्या बायकोच्या संमतीने दुसरे लग्न करावयास काहीच प्रत्यवाय नसावा. परंतु अडचण अशी आहे की...कोणती स्त्री आपल्या नवऱ्याला दुसरं लग्न करण्याची परवानगी देऊ शकेल !

यावर पुराणमतवाद्यांनी तात्काळ सारवासारव केली, हा निव्वळ प्रचार आहे. प्रत्यक्षात किती मुसलमान चार–चार बायका करतात ? वगैरे.

मग ' पर्सनल–लॉ 'चा हट्ट तरी का बुवा !

—अर्थात हा माझा आपल्याच मनाला प्रश्न !

परंतु याहीपेक्षा गफारखानांनी उपस्थित केलेल्या दुसऱ्या एका मुद्याचे विशेष महत्त्व वाटते. तो मुद्दा जातीय दंगलींसंबंधीचा. जातीय दंग्यांची कारणमीमांसा करताना खानसाहेबांनी असा आरोप केला की, दंगलीच्या काळात कायदा नि सुव्यवस्था राखण्यात सरकार असमर्थ ठरल्यामुळेच अहमदाबादसारखे भयंकर हत्या॰ कांड घडू शकते. सरकारने कडक धोरण स्वीकारले तर हिंसाचार माजतीलच कशे, असा त्यांचा युक्तिवाद आहे.

या युक्तिवादाचेही खंडन नि सरकारचे समर्थन करण्याचा एकाने प्रयत्न केला असता आत्यंतिक मिस्किल स्वरात खानसाहेबांनी त्याला विचारलं,

" तुम गव्हंमेंट सव्हंट हो क्या ?"

व्यक्तिशः मला गफारखानांचा सरकारवरील गलथानपणाचा आरोप पटतो. कारण १९६५ साली पुण्यात गणेशोत्सवाच्या वेळी झालेल्या भयंकर जातीय दंग॰ लीचे पडसाद सोलापुरातही उमटू नयेत म्हणून तेथील डी. वाय्. एस्. पी. यांनी जी दक्षता घेतली होती, जी चोख व्यवस्था ठेवली होती, ती मी प्रत्यक्ष पाहिलेली आहे. दिवसरात्र शहरभर गस्त घालीत हिंडणारी वायरलेस अफवा पसरविणाऱ्यांना अक्षरशः अलगद उचलून नेत होती...परिणामी त्यावेळी तेथे कसलाही अनुचित प्रकार घडला नव्हता.

या संदर्भात नेहमी सांगितली जाणारी आणखी एक सबब म्हणजे पाकिस्तानी हेरांकरवी दंगल घडविली गेली, ही. त्यावर गफारखानांचा सवाल असा, अरे मग त्या हेरांना पकडत का नाही ? त्यांना किंवा जे जे राष्ट्रद्रोही असतील त्या साऱ्यांना पकडून कडक शासन का करीत नाही ? गरीब बिचाऱ्या हिंदु–मुस्लीमांचे जीवित नि वित्त यावर घाला घालणाऱ्यांना का सोडता ?

त्यांचे म्हणणे असे की भारतात सेक्युलॅरिझम फक्त कागदावरच आहे. मुळात सत्ताधारी नि विरोधी या दोन्ही पक्षांना जातीय वैमनस्य हवेच आहे. गरीब बिचाऱ्या हिंदू-मुसलमानांना आपसात लढवत ठेऊन त्यांना आपल्या नाकर्तेपणावर नि स्वार्थलोलुपतेवर पांघरूण घालावयाचे आहे. एवढंच नव्हे तर हिंदू-मुस्ली॰ मातील जातीय तेढीचे ते भांडवल करतानाही आढळतात. उभयतांनाही चिथावणी देऊन त्या द्वेषाग्नीवर स्वतःची पोळी भाजून घेण्याची एक बेशरम नि दुष्ट प्रवृत्ती इथे रुजू पाहते आहे. द्विभार्या प्रतिबंधक कायदाच उदाहरणादाखल घ्या. हे फूटपाडे लोक एकीकडे मुस्लीमांना असे म्हणतात की, असा कायदा केल्याने तुमच्या इस्लाममध्ये हस्तक्षेप होणार आहे नि दुसरीकडे हिंदूंना भडकवण्यासाठी म्हणतात, मुस्लीमांना वेगळे कायदे का म्हणून ? द्विभार्या प्रतिबंधक कायदा त्यांना लागू न केल्यास त्यांची लोकसंख्या वाढणार नाही काय ? इत्यादी.

आणि सर्वाधिक खेदाची नि दुर्दैवाची बाब अशी की लोकशाहीत लोकमत

प्रचार करण्यासाठी, लोकशिक्षण देण्यासाठी ज्या वर्तमानपत्रांनी बद्धपरिकर असा-यायास हवे तीही विपर्यस्त नि भडक बातम्या हेतुपुरस्सर छापून दोन्ही जमातींना भडकवण्याचा, चिथविण्याचा अव्यापारेषु व्यापार करताना आढळतात.

या संदर्भात मला अहमदाबादच्या दंगलीच्या बहुतेक सर्वच वार्तापत्रांमधून आलेला एक उल्लेख आवर्जून आठवतो. तिथल्या एका स्थानिक साप्ताहिकाने हिंदूंना चिथावणी दिल्याचा तो उल्लेख होय.

आणखी एक अगदी ताजे उदाहरण द्यावयाचे म्हणजे : पुण्यातील स्वारगेट-जवळील स्वारबाबा दर्गा हलविण्याच्या कामी केंद्रीय मंत्री यूनूस सलीम यांच्या लुडबुडीनंतरही संबंधित अधिकाऱ्यांनी कमालीची कल्पकता नि दक्षता दाखविलेली असताना व ते प्रकरण आता निकालात निघालेले असतानाही पुण्यातील एका साप्ताहिकाच्या ताज्या अंकात जो मजकूर प्रसिद्ध झाला आहे त्याचा एकूणच सूर असा की,– बघा कशी जिरली मुस्लीमांची ! याचा अर्थ दर्गा हलविल्याबद्दल मला मोठे दुःख वाटते असा नव्हे. उलट, व्यक्तिशः मला कुठल्याच दर्ग्याविषयी वा मंदिराविषयी सोयरसुतक नाही. परंतु गफारखानांनी वृत्तपत्रांच्या वर्तमाननीती नि प्रवृत्तीविषयी जे सांगितले, ते सोदाहरण पटविण्यासाठी हा प्रपंच. अन्यथा या दर्गाप्रकरणावर मी अनेक मुस्लीममित्रांशी भांडलो आहे. त्यांचे म्हणणे असे की, दर्गा हलविता येणार नाही, कारण तेथे संबंधित पीराला पुरलेले असते आदि. परंतु माझा त्यांना सवाल असा की, हिंदूंच्या मंदिराविषयीही असेच म्हणता येईल. त्यांच्याही अनेक वर्षांच्या श्रद्धा त्या विशिष्ट जागेशी निगडीत असू शकतील. माझा मुद्दा अधिक स्पष्ट करण्यासाठी मी श्री. दि. बा. मोकाशी यांच्या 'देव चालले'ची थीमही त्यांना समजाऊन सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांची 'चिवरी' काही औरच ! असो.

याबाबतीत गफारखानांची मतं काय आहेत ते अद्याप तरी कळू शकलेले नसले तरी त्यांनी आपल्या व्याख्यानातून मुस्लिमांना विज्ञानाधिष्ठित असा आधुनिक दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन केले आहे. त्यावरून किंवा त्यांच्या MY LIFE AND STRUGGLE या आत्मचरित्रावरून किंवा वेळोवेळी त्यांनी इस्लामचा लावलेला अर्थ लक्षात घेतल्यास धर्मपरायण असूनही त्यांची मतं बुरसट-लेली वाटत नाहीत.

इस्लामविषयीचे त्यांचे अभिप्राय पहा – Islam means serving God through service of his creatures, irrespective of caste, creed and colour...

एका कट्टर धर्माभिमान्याने एकदा त्यांना विचारले,

" How can we be friends of Hindus who are idol-worshipers ?"

"What are we? What is the worship of the tombs? How are the Hindus less devotees of God when they believe in one God? The Koran is absolutely clear that faith in one God and good work are enough to secure a man salvation. The aim of Prarthana or Namaz is to purge ourselves of all dross and to realise a bond of unity with entire humanity."

तसेच आंतरधर्मीय विवाहासंबंधीचे त्यांचे हे विचार–

..Why should not a husband and wife adhere each to their respective faihts? Why should marriage should alter one's faith?...

खुद्द आपल्या भावाच्या इंग्रज पत्नीने इस्लाम धर्माचा स्वीकार केला आहे की ती ख्रिश्चनच राहिली आहे, हे जाणून घ्यावयालाही ते उत्सुक दिसत नाहीत.

सारांश पदोपदी इस्लामची ढाल पुढे करून सवलतींसाठी हट्टाला पेटणाऱ्यांची तोंडे ते अशा प्रकारे बंद करू शकतात. खरं तर हिंदू आणि मुसलमान या उभयतांवर त्यांचा असा जाहीर आरोप आहे की, त्या दोघांनाही खरा धर्म कळलेलाच नाही!

बफारखानांनी आजवरच्या आपल्या भाषणांमधून मुस्लीमांची भरपूर कानउघाडणी केली असताही त्यांच्याविरुद्ध कोणी निषेधाचा शब्द काढल्याचे ऐकिवात नाही—'इस्लाम खतरे में' आल्याचा गिल्लाही कोणी केलेला नाही. याचे इंगित हेच की, बफारखानांचा इस्लाम धर्माचा प्रगाढ व्यासंग नि अधिकार, असे निदान मला तरी वाटते.

परवाच्या पुण्यातील चर्चेच्या वेळीही मुस्लीमांच्या मनात या नेत्याविषयी आकसापेक्षा आदरच असल्याचा आढळ झाला. उपस्थितात बहुसंख्य मुस्लीमच होते, हाही माझ्या या विधानाचाच पुरावा होय. सबब या चर्चेच्या वेळी माझ्या मनात असा प्रश्न उभा राहिला की हे असे कसे? साहाजिकच मला हिंदू-मुस्लीम प्रश्नावर सातत्याने बोलणारे नि लिहिणारे आपले हमीद दलवाई यांची आठवण झाली. कारण आजवर मी श्री. दलवाईंची अनेक भाषणे ऐकली आहेत, बहुतेक लिखाण वाचले आहे. एवढेच नव्हे तर संधी मिळेल तेव्हा त्यांच्याविषयी मुस्लीम समाजातील लोकमतही जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांचे भाषण ऐकताना माझ्या मुस्लीम मित्रांच्या प्रतिक्रियाही अवलोकन केलेल्या आहेत...त्यावर तासन् तास चर्चाही केलेली आहे; परंतु प्रत्येक वेळी मला कटू अनुभव आलेला आहे. त्यामुळे साहाजिकच बादशहाखानांबरोबरच्या चर्चेच्या वेळी दिसून आलेला अनुकूल प्रतिसाद पाहून मी श्री. दलवाईंच्या प्रयत्नांची अधिक सखोल अशी चिकित्सा आपल्या मनाशी करू लागलो तेव्हा या निर्णयाप्रत आलो की, त्यांची

तळमळ कितीही प्रामाणिक असली, या समस्येचे त्यांचे विश्लेषण अगदी तर्कशुद्ध नि समर्पक असले तरी प्रत्यक्ष समस्या हाताळण्याची त्यांची हातोटी (Approach) मुळीच निर्दोष नाही. हिंदू-मुस्लीम प्रश्न सुटण्यासाठी ते अगदी पोटतिडिकीने प्रयत्न करीत असले तरी त्यांना अद्याप योग्य ती दिशाच गवसलेली नाही...अगदी स्पष्टच सांगायचं म्हणजे आग सोमेश्वरी नि बंब रामेश्वरी अशीच एकूण त्यांच्या प्रयत्नांची अवस्था आहे. आणि म्हणूनच ते अरण्यरुदन ठरू पहात आहे. कारण असं पहा. त्यांची सारी भाषणं हिंदूंच्या पुढे होत असतात. बहुतेक लिखाण मराठी वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध होत असते. ते मुस्लीमांपर्यंत पोचते तरी काय? शिवाय ज्यांचा प्रश्न ते हाताळीत आहेत त्यांच्याशी दलवाईंचा कितीसा संपर्क आहे? मुसलमानात ते मिसळतात काय! त्यांच्या मदतीला धावतात? उलट वस्तुस्थिती अशी आहे की, त्यांच्या एकूण एक भाषणात व लेखात मुस्लीमांविषयींचा भयंकर तिरस्कार, कुचेष्टा, हेटाळणी यांचाच आढळ होतो. तसेच लेख नि भाषणांसाठी ते वापरीत असलेली भाषा. जहाल, तिखट नि विषारी या विशेषणत्रयीशिवाय अन्य कशाने तिची संभावना करता येईल? सभा जिंकणे हा का त्यांच्या भाषणाचा उद्देश? त्यासाठी का हा सारा अट्टाहास नि आटापिटा त्यांनी चालविला आहे? या पद्धतीने त्यांचे इप्सित साध्य होईल का कार्यहानी घडेल.

वर म्हटल्याप्रमाणे नुसत्या भाषणांनी नि लेखांनी एकाद्या समाज-कार्यकर्त्याला आपल्या कार्यात यश मिळाल्याचे माझ्या तरी माहितीत नाही. उलट मला माहीत आहे ते हे की, दलितांचा उद्धार करावयाला निघालेल्या म. ज्योतिबा फुले यांनी दलितांसाठी स्वतःची विहीर देऊन त्यांच्या पाण्याचा प्रश्न सोडवला होता. महर्षी कर्वे यांनी स्वतः एका विधवेशी लग्न लावून समाजाचा रोष पत्करला होता...

याचा अर्थ असा आहे नव्हे की, त्यावेळी त्या परिस्थितीत जे मार्ग यशस्वी ठरले तेच मार्ग दलवाईंनीही अनुसरावेत. ते प्रश्न, तत्कालीन परिस्थिती, हिंदू-मुस्लीम प्रश्न, आजची परिस्थिती यात जमीन-अस्मानाचे अंतर आहे, याचे भान मला आहे. तथापि ही उदाहरणं इथं आवर्जून मांडण्याचा हेतू हा की, कुठल्याही समाज-कार्यकर्त्याला समाजाभिमुख असावयास हवे. पराङ्मुख राहून एखाद्याचे प्रश्न सोडविण्याचा त्याने प्रयत्न करणे अव्यवहार्य होय!

दुसरीही एक महत्त्वाची बाब दलवाईंविषयी मुस्लीमांचे दुमत होण्याला कारणीभूत असावी असे गफारखानांच्या भाषणावरून मला वाटू लागले आहे. ती बाब म्हणजे इस्लामचा व्यासंग. गफारखानांच्या इस्लामबाबतच्या अधिकाराला मुल्ला-मौलवीही आव्हान द्यावयाला धजावणार नाहीत. उलट, दलवाईंचा इस्लामचा व्यासंग हा मुस्लीम लोकात कुचेष्टेचा विषय आहे, हे मला माहीत आहे. मानवी स्वभावाचे ज्याला थोडेबहुत ज्ञान आहे तो हे अवश्य मान्य करील की, समोरच्या व्यक्तीचा संबंधित विषयातला अधिकार मान्य असल्याशिवाय त्या विषयावरचे

त्याचे भाष्य कोण ऐकून घेणार ? स्वामी विवेकानंदानी हिंदूंना काही काळ गीतेकडे दुर्लक्ष करून फूटबॉल खेळण्याचा आदेश दिला होता, तेव्हा त्या काळातही त्यांच्याविरुद्ध कोणी ब्र काढल्याचे मला माहीत नाही.

गफारखानांबरोबर झालेल्या त्या चर्चेनंतर या विषयासंबंधी मी विचार करीत असतानाच ता. १६–१–७० च्या 'टाइम्स'मधील अग्रलेख माझ्या वाचनात आला. अर्थात त्यात गफारखानांनी भारतातील अल्पसंख्यांक नि पाकिस्तानातील अल्पसंख्यांक यांच्या स्वास्थ्याची, सुरक्षिततेची तुलना केल्याबद्दल टीकाच भरपूर असली तरी ही गोष्ट मान्यच करण्यात आली आहे की गफारखानांनी हिंदू–मुस्लीम ऐक्यासंबंधी सुरू केलेले प्रयत्न फलदायी ठरण्याची शक्यता आहे. अर्थात दिल्ली येथे त्यांनी मुस्लीमांची जी परिषद बोलावली आहे तिच्याविषयी 'टाइम्स'प्रमाणेच चर्चेच्या वेळीही काहींनी आक्षेप घेतला असता गफारखानांनी असा खुलासा केला की, अहमदाबादला भेट दिल्यानंतर तेथल्या मुस्लीमांच्या विनंतीवरून मुस्लीमांना एकत्रित आणण्यासाठी त्या परिषदेचे प्रयोजन आहे. ती परिषद मुस्लीमांची आहे. कारण प्रश्नही त्यांचाच प्रामुख्याने आहे. अर्थात मुस्लीमेतरांना तेथे मज्जाव असेल, असे नाही. उलट, मुस्लीमेतरांनी मुसलमानात मिळूनमिसळून त्यांना पुरोगामी बनविण्याच्या दृष्टीने सलोखा वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत अशी विनंतीही केली. आपला हा मुद्दा अधिक स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, आजवर मुसलमानांना खरा नेता–हितकर्ता लाभलेलाच नाही. हिंदूंना जसे लो. टिळक, आगरकर, म. फुले लाभले तसे त्यांना लाभले नाहीत. ब्रिटीश अमदानीत त्यांचे नेतृत्व केले सरसाहेबांनी किंवा खानसाहेबांनी. परंतु ते त्यांचे हितचिंतक नव्हते, ब्रिटिशांचे हस्तक होते.

अबुल कलाम आझादांनी 'तरजुमान – ए – कुरआन' या ग्रंथाद्वारा कुराणाचा नवा अर्थ सांगण्याचा प्रयत्न यापूर्वी केला होता. परंतु दुर्दैवाने त्याचे विशेष स्वागत झालेच नाही. अब्दुल गफारखानही कुराणाचाच केवळ नव्हे तर समस्त इस्लामचाच नवा अर्थ मुसलमानांना पटवू पहात आहेत. आणि हे करीत असताना ते त्यांना आंजारीत गोंजारीत आहेत, तसेच कठोरपणे प्रहारही करीत आहेत. स्वतःला नेता म्हणवून घेणे त्यांना आवडत नसले तरी मुस्लीमांचा मार्गदर्शक बनण्यास त्यांनी नुकतीच संमती दिली आहे, ही घटना आशादायक आहे.

तूर्त तरी त्यांच्या प्रयत्नांना सुयश चिंतिण्यापलीकडे नि ते यशस्वी होतील असा आशावाद व्यक्त करण्याव्यतिरिक्त अन्य वा अधिक असे आपल्या हाती काय आहे ?

□ □ □

# वठलेल्या वृक्षांचा समाजवाद

वि. शं. पारगावकर

सिंडिकेट कॉंग्रेसच्या सर्व भाषणांचे सार म्हणजे इंदिराबाईंना शिव्या देणे आणि आम्हीही 'समाजवादी' आहोत हे सांगणे. इंदिराबाईंना शिव्या देण्यामागील मूळ हेतू कळू शकतो, तसा तो आम्हाला कळतही होता. पण 'आम्ही समाजवादी आहोत' हे सांगण्यामागे मात्र या लोकांचा काय हेतू होता हे सांगणे थोडेसे कठीण आहे. कारण 'समाजवाद' हा शब्दच अलीकडच्या काळात विनोदी झालेला आहे. कम्युनिस्ट लोकही समाजवाद हा शब्द वापरतात, नॅशनॅलिस्टही तोच शब्द वापरतात, सोशॅलिस्ट तर वापरतातच; कारण तो तर त्यांचा हक्कच आहे! प्रजासमाजवादी वापरतात, रामराज्यवाले वापरतात, जनसंघवाले वापरतात. सारांश आजच्या काळातील कोणता राजकीय पक्ष हा शब्द वापरीत नाही हाच एक संशोधनाचा विषय ठरावा!

ही परवा परवापर्यंत एक असलेली कॉंग्रेस शेवटी फुटली. फुटली ती समाजवादाच्या नावानेच फुटली. इंडिकेटवाल्या कॉंग्रेसजनांचं मत असं आहे, नव्हे त्यांचा आरोपच आहे की 'कॉंग्रेसमधले हे 'ओल्ड बॉसेस' आम्हाला 'समाजवादा'च्या मार्गावरून जाऊ देत नाहीत. या देशात आम्हाला समाजवाद आणायचा आहे आणि तो आणण्याची आम्हाला फार घाई झालेली आहे. जनता आता अधिक काळ थांबायला तयार नाही आणि अशी ही घाई झालेली भारतीय जनता आमच्या मागे आहे!'

तर सिंडिकेट कॉंग्रेसच्या ओल्ड बॉसेसनीही अहमदाबाद येथील अधिवेशन गाजवून दाखविले. आम्ही ते प्रत्यक्ष पाहिलं. २१ तारखेच्या खुल्या अधिवेशनाला जमलेला श्रोतृसमुदाय चालता बोलता एक प्रचंड महासागरच दिसत होता. त्यांनीही आपली मतं, आपली धोरणं, आपल्या निष्ठा आणि आपल्या प्रतिज्ञा या जनसमू-

# मौजे गांधीनगर

## लेखांक । चार

हासमोर मांडल्या आणि त्यांनाही याच जनसमूहाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. टाळ्यांच्या कडकडाटातून हा उत्साह उतू चाललेला दिसत होता.

निजलिंगाप्पांनाही समाजवादच हवा. स. का. पाटलांनाही समाजवादच हवा, आणि मोरारजींना हीसमाजवादच हवा. आणि आश्चर्याची गोष्ट अशी की अहमदाबाद जनतेलाही समाजवाद हवा आणि मुंबई येथे आझाद मैदानावर जमलेल्या दहा लाखाच्या जनसमुदायालाही समाजवाद हवा. मात्र मुंबईच्या लोकांना इंदिराजींचा समाजवाद हवा आणि अहमदाबादच्या लोकांना निजलिंगाप्पांचा समाजवाद हवा!

निजलिंगाप्पा म्हणाले १४ कलमी कार्यक्रमाला आम्ही केव्हाच मान्यता दिली होती. त्यांचं म्हणणं, 'इंदिराजी कम्युनिस्टांकडे ओढल्या जात आहेत.' (पण कम्युनिस्टांनाही समाजवादच हवा ना? समाजवाद झिंदाबाद!) तेच पुढे म्हणाले, 'आम्ही त्यांना (इंदिराजींना) तसे कम्युनिस्टांकडे ओढल्या जाऊ देणार नाही! आम्ही सत्तेसाठी, वैय्यक्तिक सत्तेसाठी राजकीय डावपेच लढवीत नाही. आम्हाला गरीब जनतेचं कल्याण हवं आहे. (विनोबाजींनाही गरीब जनतेचं कल्याण हवं आहे, जयप्रकाश नारायण यांनाही गरीब जनतेचं कल्याणच हवं आहे. परंतु त्यासाठी ते काही सत्तेशी स्पर्धा करीत नाहीत! कदाचित स. का., निजलिंगाप्पा हे राजयोगी समाजवादी असतील, आणि विनोबा, जयप्रकाश हे कर्मयोगी समाजवादी असतील!)

या संदर्भात मनात असा विचार येतो की पाटील १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत मुंबई येथे पडले. तसेच कामराजही तामिळनाडूमध्ये पडले तेव्हापासून तो अगदी परवा परवापर्यंत पुन्हा हे दोघे निवडून येईपर्यंत कोणत्या समाजवादाचे आचरण करीत होते? बरे निवडून येईपर्यंत यांच्या तोंडून इंदिराबाई, समाजवाद कम्युनिस्टांकडे ओढल्या जाणे वगैरे कसलेही शब्दप्रयोग नव्हते. तेव्हा सगळं कसं अगदी 'सारं शांत शांत' चालू होतं. हे दोघे लोकसभेवर निवडून आले पाटलांना तिथे एखादी खुर्ची हवी असल्यास ती मिळाली नाही. अर्थात पाटलांना खुर्चीचा मोह अगदीच नसावा असे नाही. पूर्वायुष्यात खुर्चीवरून काढून लावीपर्यंत पाटलांनी त्या 'सरकारी' खुर्चीचा उपभोग घेतलेला आहे. इतकंच नव्हे तर रेल्वेमंत्री असताना लागोपाठ अनेक रेल्वे अपघात झाले असताना आणि जनतेने त्यांच्याकडन राजीनाम्याची मागणी केलेली असताना त्यांनी तेव्हा स्वर्गीय श्री. लाल बहादूर शास्त्रींसारखा राजीनामा दिला नव्हता. अर्थात लाल बहादूर शास्त्री आणि पाटील

यांच्यात एक फरक आहे तो म्हणजे शास्त्रीजींनी लोकांकडून मागणी न येताच राजीनामा दिला होता आणि पाटलांनी मागणी येऊनही दिलेला नव्हता.

म्हणून त्यांना निवडून आल्यावर खुर्चीचा अगदीच काही मोह पडलेला नसावा अशी कल्पना करून घेणे कठीण आहे.

तेथूनच खरी अडचण आणि डावपेचांना सुरुवात झाली असे म्हणावे लागेल. मग राष्ट्रपतीपदाच्या उमेदवारीची घटना घडली आणि पुढचा सारा इतिहास तुम्हा आम्हाला माहीतच आहे.

प्रश्न आहे समाजवादाचा. बँकांचे राष्ट्रीयीकरण हा त्याचा एक भाग आहे. त्यातही आपल्या आठवणीला आपण जरा ताण दिला तर आपल्या लक्षात येईल की, बेंगलोरला या लोकांची जी बैठक झाली (आणि लगेच ती मोडली आणि त्या नंतर थोड्याच दिवसात काँग्रेसही मोडली) ती चक्क अशी तडजोड झाल्याचे बाहेर आलेले आहे. ती तडजोड अशी की इंदिरा गांधींनी राष्ट्रपतीपदासाठी सिंडिकेटने उभ्या केलेल्या उमेदवाराला मान्यता द्यावी आणि त्याच्या मोबदल्यात सिंडिकेटने बाईंच्या १४ कलमी आर्थिक कार्यक्रमास मान्यता द्यावी, अशी ही तडजोडीची मध्यस्थी यशवंतराव चव्हाण यांनीच केली होती याही गोष्टी प्रसिद्ध झालेल्या आहेत.

मग प्रश्न असा उपस्थित होतो की, जर खरोखरच हे सिंडिकेट, जर समाजवादी विचारसरणीचे होते तर हा १४ कलमी कार्यक्रम मंजूर करण्यास त्यांना अशी अट का घालावी लागली ? त्यांच्या रक्तात आणि हाडामासात जर समाजवाद भिनलेला होता तर मग या कार्यक्रमाच्या रूपाने कार्यवाहीत येणाऱ्या समाजवादासाठी यांनी अॅग्रीमेंट का केले ?

याचे उत्तरही समाजवादच. फक्त हा समाजवाद दोघांचा निराळा होता एवढेच. आता या दोन वेगवेगळ्या समाजवादाचे अंतरंग आपण तपासलं तर काय दिसेल? पाटील, निजलिंगाप्पांचा समाजवाद एक असणे एक वेळ सहाजिक आहे. पण त्यामध्ये हे कामराज कसे काय आले ते कळत नाही. आणि डॉ. राम सुभगसिंग ? तसेच आपले कट्टर समाजवादी अशोक मेहता हे गृहस्थ तर एके काळी खुद्द समाजवादी पक्षातूनच काँग्रेसकडे आलेले आहेत. हे पाच पांडव एका समाजवादाची लेकरे कशी ? हे सारेच गौड बंगाल आहे.

बरे तिकडे इंदिराबाईंच्या काँग्रेसमध्ये पाहावे तर तिथे असे इंद्रजाल आहेच. इंदिराबाई आणि यशवंतराव यांचा समाजवाद आपल्याला कळू शकतो; पण फक्रुद्दिन अलि अहमद आणि जगजीवनराम, तसेच भारताचे दोन वेळा पंतप्रधान झालेले जी. एल. नंदाजी. फक्रुद्दिन मियाँ तर आपल्या मुसलमान बांधवांवर अन्याय होऊ नये या काळजीत रात्रंदिवस असतात आणि जे जगजीवनराम स्वतः दहा वर्षे इनकम् टॅक्स भरला नाही म्हणून खुद्द समाजवादालाच काळजीत टाकतात त्यांच्या निष्ठा,

प्रतिज्ञा योग्याविषयी काय लिहावे? परंतु या बाबतीत पुन्हा एकदा भारतीय जनते चाच जयजयकार करावा असे मनात येते. कारण लाखोंच्या संख्येनं मुंबई येथे याच जगजीवन रामांचा जयघोष याच जनतेनं केलेला आम्ही प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिला! आणि आमच्या डोळ्यांचे पारणे फिटले! इतकेच नव्हे तर आझाद मैदानावरील दहा लाख जनतेच्या साक्षीनेच सरकारी काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून जगजीवनरामजी त्या आसनावरही विराजमान झालेले आम्ही पाहिले.

निजलिंगाप्पा म्हणाले, 'केवळ बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे म्हणजे काही समाजवाद आणणे होत नाही.' तसेच एस्. एन्. मिश्रा म्हणाले की, 'नेहरूंनी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले नाही म्हणून नेहरू समाजवादी नव्हते असे कोणी म्हणू शकेल काय?' इंदिरा गांधींवर हल्ला चढविताना पाटील नेहरूंची स्तुती करीत होते. जणू काही पाटलांचे मत नेहरूंविषयी काय होते हे जनतेला माहीतच नाही! महाराष्ट्रातील जनतेला तर ते चांगलेच माहीत आहे. आणि समजा पाटील स्वतःला भारतीय पातळीवरील नेता समजत असतील तर मग अहमदाबादच्या जनतेला देखील पाटलांचे नेहरूंविषयींचे मत माहीत असायला काही हरकत नाही!

पाटील म्हणाले होते: नेहरूंना आपल्या मंत्रिमंडळातील एखादा सामान्य मंत्री जरी काढावयाचा असला तरी ते अस्वस्थ होत असत. त्याला जायला सांगणं त्यांच्या जिवावर येत असे. मला एकदा नेहरू म्हणाले होते, 'पाटील, अमुक मंत्र्याला तुम्ही राजीनामा द्यावयास सांगा.' तेव्हा मी म्हणालो, 'ते बरोबर दिसणार नाही. आपण प्रधानमंत्री आहात, आपणच त्याला तसं सांगायला हवं.' त्यावर नेहरू म्हणाले होते, 'मला अवघडल्यासारखं होतं. त्याला तसं सांगणं जीवावर येतं!'–आणि नेहरूंनी त्या सामान्य मंत्र्यालादेखील पुढील निवडणुका होईपर्यंत काढलं नाही. कुणीकडे पंडित नेहरू आणि कुणीकडे उपपंतप्रधानांचं खातं चुटकीसरशी काढून घेणारी त्यांची कन्या इंदिरा!'

बरोबरच आहे! शेकडो रेल्वे अपघात झाले तरी नेहरू पाटलांना जाब विचारीत नव्हते ना!

मात्र एवढी एक गोष्ट खरी की काँग्रेसचा हा गोमकाला फुटल्याबरोबर त्यामधून किती प्रकारच्या अजब चिजा बाहेर पडत आहेत! राजकीय इतिहासकाराला ही एक पर्वणीच आहे. कारण इंदिरा गांधींनी सारा देश मागे नेला म्हणण्याच्या भरात काही काही वक्त्यांचो मजल तर चांगली १०।१५ वर्षे मागे गेली! उदाहरणार्थ महाराष्ट्रद्रोह्या शारदा मुखर्जी बोलताना म्हणाल्या की, 'इंदिरा गांधींनी सारा देश रसातळाला नेला!' अक्षरशः बोलायचे झाले तर डॉ. झकीर हुसेन यांच्या मृत्यूपूर्वी देश अगदी प्रगतीपथावर होता. लोकशाही मार्गाने चालला होता, समाजवाद अवतरलेला होता आणि कुठेच, कशाचो, काही कम-

तरता नव्हती ! तेव्हाही पंतप्रधान इंदिरा गांधीच होत्या. पण राष्ट्रपतीपदाच्या उमेदवारीची माशी कुठेतरी शिंकली आणि मग मात्र लगेच असंतुष्ट कांग्रेस उमेदवाराच्या दृष्टीने इंदिराजी कम्युनिस्ट झाल्या, हुकूमशहा झाल्या, महाराणी झाल्या !

समाजवादाची आणि लोकशाहीची फॅशन करणाऱ्या या सिंडिकेट पक्षातील एक तारका श्रीमती तारकेश्वरी सिन्हा तर आपल्या आवेशयुक्त भाषणाच्या ओघात म्हणाल्या, ' आम्ही शास्त्रीजींच्या मुलाला पंतप्रधानपद दिले नाही, तर नेहरूंच्या मुलीला ते दिले याचे कारण नेहरूंचे आमच्यावर फार उपकार होते. (आमच्यावर म्हणजे कुणावर कुणास ठाऊक !) परंतु बोलण्याच्या कैफात तारकेश्वरीबाईंना याचे भान राहिले नाही की, ' आपण बाईला पंतप्रधानपद दिले ' असे म्हणताना आपणच लोकशाही पद्धतीची पायमल्ली केली आहे ! इंदिराजींना पंतप्रधानपद बहाल करणाऱ्या (अगदी नेहरूंचे उपकार स्मरून का होईना) या तारकेश्वरीबाई कोण ? शिवाय ही गोष्ट साऱ्या जगाला माहीत आहे की, पहिल्या वेळी इंदिरा गांधींनी नेतृत्वपदासाठी मोरारजी भाईंशी निवडणूक लढवून त्यांच्या विरुद्ध विजय मिळविलेला आहे. आणि दुसऱ्या खेपेसदेखील हाच निवडणुकीचा प्रसंग हट्टी मोरारजी भाईंच्या हेकटपणामुळे अटळ होता. बाईंनी एकदा त्यांचा पराभव केला होता आणि १९६७ सालातील कॉंग्रेसचे चित्र भकास आणि भयानक होते. कितीतरी प्रांत कॉंग्रेसच्या पायाखालून गेले होते. तेव्हा केंद्रातही अशी आपसातच दुही सुरू झाली तर कॉंग्रेस गोत्यात येणार होती. म्हणून याच समाजवादी कामराजांनी हा अटीतटीचा सामना टाळला. बाई निवडून येणार याविषयी शंकाच नव्हती आणि काहीही करून कामराज यांना मोरारजींचे नेतृत्व नको होते.




(आज मात्र कामराज आणि मोरारजी खांद्याला खांदा लावून उभे आहेत. हीही भारतीय राजकारणाच्या पोतडीतील एक जादूच!) तारकेश्वरीबाई म्हणतात त्यानुसार नेहरूंनी देशावर केलेल्या उपकारांना स्मरून इंदिराबाईंना काही कोणी पंतप्रधानपद दिले नव्हते. परंतु बिचारी जनता. भाषणात (कुणाच्याही) कुठेही नेहरूंचं नाव आलं की टाळ्या मारायच्या या लोकांडे तिचो अजून मजा गेलेलो नाही! जसे सिनेमा थिएटरमध्ये म. गांधींचे चित्र आले की टाळी पडायचीच.

इंदिरा गांधींनी यावेळी १४ कलमी आर्थिक कार्यक्रमाचा आग्रह धरला आणि काही लोकांना बेगडी समाजवाद डळमळू लागला. या लोकांचे आजपर्यंतचे राजकारणाबाहेरच्या मालकांचे चेहरे यांना आठवू लागले. कॉंग्रेसचं एवढं मोठं प्रचंड धूड पोसणारे, राज्यकारभार एकमुखी आणि आपल्या ध्येयधोरणानुसार चालावा म्हणून या मालकांनी कॉंग्रेसला आजवर सर्वतोपरी मदत केली होती! कॉंग्रेस सरकारने समाजवाद आणावा म्हणून, कॉंग्रेस सरकारच्या हातून लोकशाही जिवंत राहावी म्हणून!

हाच तो समाजवाद आणि हीच ती लोकशाही. पाटलांना मोरारजींना, आप्पांना, सिंडिकेटला अभिप्रेत असलेली, जिच्या रक्षणासाठी ते प्राणपणाने इंदिराजींशी लढू म्हणत आहेत! धनिकांचा समाजवाद आणि चोरांची लोकशाही. ज्या इंदिराजी कम्युनिस्टांकडे ओढल्या जात आहेत म्हणून या ओल्ड बॉसेसनी गिल्ला केला त्यांचेच म्होरके श्री. मोरारजी आज म्हणत आहेत की, इंदिरा गांधींचं सरकार पाडण्यास वाटेल तर आम्ही सर्व विरोधी पक्षांची मदत घेऊ. जनसंघाची घेऊ, स्वतंत्र पक्षाची घेऊ, अगदी कम्युनिस्टांचो दखोल घेऊ. मात्र ती त्यांनी बिनशर्त दिली पाहिजे!

राजकारणाची हीच तर गंमत असते सत्तेवरून ओढलेल्या मोरारजींना विरोधी पक्ष बिनशर्त मदत देऊ शकत नसतात हे अजून कळायचे आहे! जणू काही आतापर्यंतची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी यांना कॉंग्रेसबाहेरच्या मालकांनी बिनशर्तच मदत दिलेली आहे!

म्हणजे या लोकांचे वेड म्हणा, व्यक्तिद्वेष म्हणा किंवा सत्तेची हाव म्हणा विकृतीच्या किती पराकोटीला गेली आहे!

सिंडिकेटचा गांधीनगरमधील रंगमंच अशा या वगनाट्याने गजबजून गेला होता. पाठीमागे महात्मा गांधींची मोठी तसबीर होती. त्याच्या उजव्या बाजूला पंडित नहरू आणि डाव्या बाजूला सरदार वल्लभभाई पटेल यांच्या तसबिरी. तसेच पलीकडे दूर लाल बहादुर शास्त्रींची तसबीर होती. या सच्चरित्र आणि चारित्र्य असणाऱ्या महान व्यक्तींच्या पार्श्वभूमीवर सिंडिकेटच्या सभा झडत होत्या. निजलिंगप्पाजो मधोमध मागे लोडाला टेकून एटीत बसले होते. त्यांच्याजवळ डॉ. राम सुभग सिंग आणि डाव्या बाजूला कामराज नाडर बसलेले

होते. पाठीमागची निर्जीव चित्रे आणि समोरची हालती, चालती, बोलती सजीव चित्रे पाहण्यात आणि त्यांची तुलना करण्यात मौज होती.

फरक एवढाच होता की, गांधींना 'समाजवाद' माहीत नव्हता ! त्यांचा शब्द होता 'स्वराज्य.' सरदार पटेलांना तर असल्या गोष्टींशी काहीच कर्तव्य नव्हते. कुठल्याच तत्त्वज्ञानाची नुसती पोपटपंची करणे त्यांच्या रक्तातच नव्हते नेहरूंना मात्र 'समाजवाद' हा शब्द माहीत होता. अनेक वेळा या शब्दांचे झटके त्यांनाही झालेले आहेत. परंतु या बाबतीत त्यांची वृत्ती स्वप्नाळूच होती. आयुष्याच्या शेवटी शेवटी समाजवादी कार्यक्रमावर त्यांनी भर देण्याचे आणि आपल्या शक्ती केंद्रीत करण्याचे त्यांनी ठरविले होते. भुवनेश्वर येथील कॉंग्रेसमध्ये तसा उच्चारही झाला होता. पण त्यानंतर नेहरूंना आयुष्य मिळाले नाही आणि त्यांचे स्वप्न त्यांच्या मृत्युबरोबरच विरून गेले.

आणि जरी आयुष्य मिळाले असते तरी भारतीय जीवनपद्धतीला आवश्यक असणारा समाजवाद नेहरूंना प्रत्यक्षात आणता आला असता की नाही याची शंकाच आहे. नेहरूंच्या मनात 'समाजवादी समाजरचने'चे स्वप्न नक्कीच होते, परंतु पंतप्रधान आणि भारताचा एकमेव नेता या दृष्टीने नेहरूंपुढे, अनेक बाजूंनी पोखरलेल्या या देशातील समाजाला, लोकशाही राजवट टिकवून औद्योगिक युगात न्यावयाचे होते. मागासलेल्या देशात आर्थिक नियोजन करताना लोकशाही राजवटीतही काही प्रमाणात सक्ती करावी लागते आणि नियोजनाचे जे सूत्रधार आणि सहकारी असतात ते एका विचाराने बांधले जाणे आवश्यक असते. पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात त्यांच्या आर्थिक दृष्टीशी समरस होऊन कार्य करणारे कोणीच नव्हते. जे होते त्यांना लोकांत स्थान नव्हते. म्हणजे पंडित नेहरूंचे मंत्रिमंडळ ही आवळ्या भोपळ्यांची मोट होती आता या अधिवेशनाच्या रंगमचावर विराजमान झालेले लोक नेहरूंच्या मंत्रिमंडळात होते, त्यांचे सहकारी होते; पण ध्येयधोरणाच्या, दृष्टीकोणांच्या आणि कार्यवाही करण्याचा दृष्टीने हे लोक त्यांच्या जवळपास देखील फिरकण्याच्या योग्यतेचे नव्हते.

त्यामुळे 'समाजवाद' हा शब्द केवळ कॉंग्रेसच्या दरवर्षीच्या जत्रेतच उच्चारायाचा शब्द एवढाच या शब्दाला अर्थ उरला. आजही या शब्दाचा उच्चार येथे गांधीनगरमध्ये त्याच अर्थाने होत आहे. त्यात फरक असेल तर एवढाच की, आज हा शब्द उच्चारणारे हे दोन तीन लोक केवळ दुय्यम दर्जाचे नेतृत्व करणारेच नाहीत तर पालवी झडून जाऊन वठलेल्या वृक्षांप्रमाणे यांचे जीवन उरलेले आहे. म्हणून यांची सारी व्याख्यानबाजी ऐकून मला वाटले की कोवळ्या, ताज्या लुसलुशीत पानांच्या सळसळीतून 'समाजवाद' हा शब्द येत नसून वठलेल्या वृक्षाच्या ढोलीतून तो येत आहे !

□ □ □

रशियन राज्यक्रांतीविषयी प्रचारात्मक
साहित्य विपुल आहे. उजेडात आलेल्या
नवीन माहितीच्या आधारे लिहिलेला
मराठीतील हा मात्र एकमेव ग्रंथ आहे.

# व्होल्गा जेव्हा लाल होते

प्रस्तावना : ना. ग. गोरे

लेखक : वि. स. वाळिंबे

मूल्य : अठरा रुपये

राजहंस प्रकाशन : १०२५ सदाशिव पेठ : पुणे ३०

उपाध्यक्ष मॅडीगन आपल्या निर्णयाला येऊन पोहोचले आणि मंत्रिमंडळाची बैठक संपत आली.
'पण हा निर्णय फक्त अध्यक्षच घेऊ शकतात' – परराष्ट्रमंत्री.

'मीच आता अध्यक्ष आहे.'

'नाही' खोलीच्या दुसऱ्या टोकाकडून आवाज आला...आणि...

---

"माय गॉड" मिचेल टोकीन ओरडले.

मंत्रिमंडळाच्या खोलीच्या प्रवेशद्वारात, जवळजवळ दाराची सर्व आकृती व्यापून अमेरिकेचे सदतिसावे अध्यक्ष जर्मी हेन्स उभे होते.

जेम्स शार्की काहीच बोलले नाहीत, परंतु त्यांच्या चेहऱ्यावर एक खळी दिसत होती

मजूरमंत्र्यांनी नुसताच दिर्घ श्वास घेतला. "थँक् गॉड !"


कोडयात पडलेले दळणवळणमंत्री म्हणाले, "मला काहीच कळत नाही."

संरक्षणमंत्र्यांनी प्रथम अविश्वासाने आपली मान हालविली आणि नंतर नुकत्याच निघून गेलेल्या काळ्या ढगांमुळे एखादा भूभाग सूर्यप्रकाशामुळे उजळून निघावा तसा त्यांचा चेहरा उजळून निघाला.

अर्थमंत्री म्हणाले, "पण इतका काळ कुठे दडी मारली होतीत ?"

आणि फ्रेडरीक जे. मॅडीगन यांच्या चेहऱ्यावर उत्कर्षबिंदूच्या समयी येणाऱ्या आश्चर्य, धक्का, निराशा या भावनांचे नर्तन सुरू होते. त्यांच्या चेहऱ्यावर भीती आणि सुटकेचे भाव चमकत होते. त्यांचे तोंड काहीतरी बोलण्यासाठी उघडले गेले, पुन्हा बंद झाले, आणि त्यांच्या अंतरंगातून उफाळून येणाऱ्या दोनच शब्दांना

# अध्यक्ष गमावले



**रतनलाल भंडारी** **तीन**

वाट करून देताना त्यांचे सारे शरीर थरथरून उठले. जणू त्यांच्या साऱ्या शरीराला त्यांनी आणलेल्या उसन्या अवसानाला धक्का बसून त्यांची अधिकारवस्त्रे हिसकावून घेण्यात आली होती.

" अध्यक्ष महाशय ! " त्यांच्याच दिशेने येणाऱ्या हेन्सकडे पहात ते उद्गारले. मॅडीगननी आपला तोल सावरीत, एखादा पराभूत मनुष्य जसा आपल्या प्रतिस्पर्ध्याचे स्वागत करतो तसे आपला हात पुढे करून स्वागत केले.

हेन्सनी सर्व प्रकार एका नजरेनेच ताडला होता. " फ्रेड् ' आपल्या नेहमीच्याच सहज आवाजात ते म्हणाले, " आपणाला दुसरी खुर्ची लागेल असे मला वाटते. "

मॅडीगन हे अध्यक्षांच्या नावाची खुर्ची वापरीत होते. दूर कोपऱ्यात पडलेली उपाध्यक्षांची खुर्ची आणण्यास जेव्हा उपाध्यक्ष धडपडत गले तेव्हा शार्कोला खूप हसावेसे वाटत होते. उपाध्यक्षांचा चेहरा लालेलाल झाला होता. त्यांनी आपली खुर्ची आणली आणि पूर्वीच्याच जागी ठेवली. उपाध्यक्ष आणि परराष्ट्रमंत्री यांच्यामध्ये हेन्स बसले.

" तुमचे आगमन अगदी योग्य वेळी झाले. ज्याला आपण निक् ऑफ दी टाईम म्हणतो तेव्हा. " मॅडीगनच्या आधीच गळालेल्या अवसानाला आणखी एक धक्का

देण्याची इच्छा गिलबर्टना आवरता आली नाही. "मंत्रिमंडळाच्या बहुमताने उपाध्यक्ष महाशय तिसरे महायुद्ध सुरू करावयास निघाले होते. ते आता आपल्या युद्धकचेरीला तसा इषाराही देणार होते."

आपणाला ठाऊक असल्याची भावना अध्यक्षांच्या नजरेत तरळत होती. "काय करणार होतात फ्रेड ?"

आश्चर्याची गोष्ट अशी की शार्कीना उपाध्यक्षांच्या विषयी सहानुभूतीच नव्हे तर त्यांना समजून घेण्याची भावना उफाळून आली होती. "त्यांना योग्य वाटत होते ते करीत होते. अध्यक्ष महाराज, मला असे वाटते की, आतापर्यंत मंत्रिमंडळाला ठाऊक नसलेल्या, परंतु मला आणि जनरल जिगरला ठाऊक असलेल्या गोष्टी आपणा सर्वांना स्पष्ट करून सांगितल्या पाहिजेत.

म्हणजे परराष्ट्रमंत्र्यांना व सेनापतींना हेन्सच्या गैरहजेरीबद्दल कसलेही रहस्य वाटत नव्हते. परंतु उपाध्यक्ष अद्यापही अंधारातच चाचपडत होते. त्यांच्या दृष्टीने हा दुसरा धक्का होता. त्यांनी विचारले "जर तुम्ही, आपण कोठे होतात, ही काय भानगड आहे ते स्पष्ट करून सांगाल तर बरे होईल."

## रशियन पंतप्रधानांशी वाटाघाटी

हेन्सनी आपली मान डोलावली. त्यांनी आपल्या समोरच आपले दोन्ही हात एकमेकात गुंतविले आणि बोलण्यास सुरुवात केली.


"मित्र हो, पहिल्यांदा अतिशय महत्त्वाच्या गोष्टीचा खुलासा करतो. गेले चार दिवस मी कॅंप डेव्हीडमध्ये सोव्हिएट युनियनचे प्रंतप्रधान ॲलेक्सी बुझेंस्की यांच्या बरोबर होतो."

"आम्ही एकमेकांच्या मदतीचा एक करार आताच पूर्ण केला आहे. अर्थातच या कराराचा उद्देश चीनला आक्रमणापासून परावृत्त करण्याचा आहे. त्यातील कलमे अतिशय साधी आहेत."

"जर चीनने रशियावर हल्ला केला तर आम्ही त्यांच्या मदतीला जाणार आहोत. जर चीनने आपल्यावर हल्ला केला तर सोव्हिएट युनियन पेकींग बरोबर युद्धाचा पुकारा करून हल्ला करील. या करारामुळे आम्हाला असा विश्वास वाटतो की चीनला स्वतःच्या नाशाची खात्री पटेल. तसेच यामुळे रशिया आणि अमेरिका यांच्या सहकार्याचे नवे युग सुरू होणार आहे."

"मला अशी खात्री वाटते, तुमच्या आता हे लक्षात आले असेल, की पाम स्प्रिंग्जची वारी हा एक बहाणा होता. हा झालेला दुर्दैवी अपघात! ही गोष्ट अत्यावश्यक होती, कारण मी कुठे आहे हे रशियन पंतप्रधानांबरोबरच्या वाटाघाटी संपेपर्यंत कुणालाही कळणे धोक्याचे होते.

"या बैठकीचा तपशील मॉस्को ते वॉशिंग्टनमध्ये असलेल्या हॉट लाईनवर ठरविण्यात आला होता. रशियन पंतप्रधान हे अमेरिकेच्या जुन्या 'एअर फोर्स एफ'



अमेरिकेचे सदतिसावे अध्यक्ष दारात उभे होते...

मधून अमेरिकेत येऊन दाखल झाले होते. 'एअर फोर्स एफ'च्या उड्डाणानंतर बरोबर सात तासांनी हे विमान अँड्यूज विमानतळावर उतरले होते मी आणि परराष्ट्रमंत्री शार्की त्यांना विमानतळावर भेटलो आणि आम्ही लगेच बंदिस्त मोटारीत कँप डेव्हीडला वाटाघाटींसाठी गेलो. आम्हाला कुणीही पाहिलेले नाही याची आम्हाला खात्री होती.

"आणि नंतर अॅरोझोनमधील भयानक अपघात घडला. मी भयानक अशा कात्रीत सापडलो होतो."

"मी बुझेंस्कींना माझा शब्द देऊन बसलो होतो की आपली ही बैठक अतिशय गुप्त स्वरूपात राहील. त्यांची आणि माझी शेवटपर्यंत हीच इच्छा होती. कारण या बैठकीचा जरादेखील वास चीनला आला असता तर त्यांनी लगेच रणशिंग

फुंकले असते. या विमानाला अपघात होईल हे आमच्या स्वप्नातदेखील आले नव्हते. जेव्हा हा अपघात झाल्याचे समजले तेव्हा माझ्या राष्ट्राला घोटाळयांची आणि गोंधळांची भयंकर शिक्षा देत आहे या वेदनेने मी होरपळून निघालो होतो. पण मी असमर्थ होतो. मी कुठे आहे हे सांगणे म्हणजे सर्वच कट फसला असता; किंवा एखाद्या हुशार माणसाने माझ्या अज्ञातवासाचा योग्य तो अर्थ लावला असता. त्यामुळे आमची लहानसासुद्धा धोका पत्करण्याची तयारी नव्हती "

"अध्यक्ष महाराज", टोकीनना उत्सुकता दाबून ठेवणे शक्य झाले नाही. "तो आगांतुक कोण होता? तुमच्या जागी कोण गेले? त्यांनी आम्हाला चांगलेच बनविले..."

जर्मी हेन्सच्या चेहऱ्यावर दुःखाच्या छटा पसरल्या. "माझ्या स्वतःच्या राज्यातील तो माझाच लांबचा भाऊ होता. त्याला कुटुंब-कबिला नव्हता. ब्रह्मचारीच होता तो. तो बहुतेक माझ्यासारखाच दिसे व त्यांची एकंदर अंगलट व ठेवण माझ्यासारखीच होती. त्याच्या व माझ्या उंचीतला थोडासा फरक त्याच्यासाठी थोडे उंच बूट तयार करून भरून काढण्यात आला होता. बरेच दिवस मला त्याची आठवण नव्हती; परंतु जेव्हा हा कट आकार घेऊ लागला तेव्हा त्याची आठवण मला झाली व तोच अध्यक्षांचा 'जुळा' वरोबर वठवील असे मला वाटले."

अजून काही गोष्टींचा खुलासा बाकी होता. याच महत्त्वाच्या वेळी अध्यक्षांचे आगमन कसे झाले?

"आज रात्रीपर्यंत कॅंप डेव्हीडमध्ये मुक्काम ठोकण्याचा माझा विचार होता." हेन्स सांगू लागले, "परंतु कोणी तरी एका पत्रकाराने मला अशी कल्पना दिली की, त्याच्या संस्थेला या गोष्टीचा सुगावा लागला असून त्यांचा एक प्रतिनिधी कॅंप डेव्हीडकडे निघाला आहे. मी ताबडतोब तेथून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. त्याला कॅंप डेव्हीड भोंवतीची संरक्षणाची सिद्धता दिसली असती आणि त्याने काही तरी कल्पित कथा प्रसिद्ध केली असती."

"म्हणजे वृत्तपत्रांना या गोष्टीची माहिती होती म्हणावयाची?" ब्रुबॅंकरनी विचारले.

"हा सगळा कट त्यांना माहीत नव्हता. त्यांना फक्त मी कॅंप डेव्हीडमध्ये वास्तव्य करीत असल्याचा संशय आला होता. परंतु त्या पत्रकाराने आपल्या संस्थेशी प्रतारणा करून एफ. बी. आय्. ला यासंबंधी कळविले होते."

मॅडीगन सावकाश, थांबत थांबत म्हणाले, "अध्यक्ष महाराज, मी कुठपर्यंत घसरत गेलो होतो हे आपण पाहिलेच आहे...तुम्ही सर्व जण आणि अध्यक्ष महोदय...आता या चार भिंतींच्या आत घडलेल्या घटना इथेच बंदिस्त रहातील तर मला समाधान वाटेल ..कारण इतिहासामध्ये जवळजवळ तिसरे महायुद्ध सुरू करणारा माणूस म्हणून माझी नोंद होऊ नये अशी माझी इच्छा आहे."

अध्यक्ष खुर्चीतून उठले. एकामागून एक मंत्रिमंडळाचे सदस्य अध्यक्षांबरोबर.

हस्तांदोलन करीत होते. मॅडीगन सर्वांत शेवटी होते. हेन्स त्यांना म्हणाले, "एक मिनीटभर थांब फ्रेड, मला तुझ्या एफटयाशीच बोलावयाचे आहे." आता त्या खोलीत अध्यक्ष असलेले आणि अध्यक्ष होऊ इच्छिणारे दोनच जीव उरले होते.

## हे दुःख अंतरीचे

"मला आता असं सांग फ्रेड" जर्मी हेन्स म्हणाले, "मी जर आता आलो नसतो तर तू बटन दाबले असतेस काय ?"

"मलाच ते सांगता येणार नाही" मॅडीगनने कबूल केले. "कदाचित दाबलेही असते. माझा स्वतःवरचाच ताबा उडाला होता. या अध्यक्षांच्या एकाकी जबाबदारीची जाणीव माझ्या डोक्यावर स्वार झालेली होती. शेवटी शेवटी जर शार्कीवरच्या रागाने मी वेडा झालेलो होतो. तुझ्यावरही रागावलो होतो. मी खरच अध्यक्ष आहे असे मला वाटत होते आणि या वेळी...माझ्या मनात काहीतरी करून दाखविण्याची दृढ भावना होती."

"मला कळतात तुझ्या भावना" हेन्स म्हणाले, "मी तुझा अधिक्षेप केला आहे फ्रेड. तुझ्यावर अविश्वास दाखविल्याबद्दल मला माफ कर. आता पुन्हा असे घडणार नाही"

"अध्यक्ष महाराज." फ्रेडरीक जे. मॅडीगन म्हणाले, "तुम्ही मला आता एक गोष्ट सांगाल काय ?"

हेन्सनी मान डोलावली.

"खरंच हे आवश्यक होते काय ?. सोळा निरपराधी जीवांचा विमानातील मृत्यू ? तुम्ही संबंध देशाला...माझ्या हाती देण्याचा धोका का पत्करला ?"


त्यांनी उपाध्यक्षांकडे बघण्याऐवजी त्यांच्या अंतरंगात डोकावून पाहिले. त्यांच्या घाऱ्या डोळयांतून ओसंडणाऱ्या, तापाने पिडलेल्या नजरेकडे रोखून पाहिले.

"मला आता हे असे सांगता येईल. भवितव्याचा मागोवा घेण्याची दिव्य दृष्टी जर मला असती आणि आम्ही आक्रमित असलेल्या मार्गावरचा हा अपघात अटळ असता तरी सुद्धा मी 'एअर फोर्स एफ'ला त्यांच्या भवितव्याला सामोरे जाण्याची आज्ञा केली असती.

"नुसता अध्यक्ष म्हणून मी हे सांगत नाही तर देशांतील सर्व सेनादलांचा प्रमुख म्हणून मी आत्मघातासाठी या विमानाला उड्डाण करावयास लावले असते. या संदर्भात फारच मोठा विनाश इरेला पडला होता.

जर्मी हेन्सनी आपला हात संथपणे उपाध्यक्षांच्या खांद्यावर ठेवला. "आणि त्यानंतर माझ्या मित्रा, हे केल्यानंतर याच अंडाकृती खोलीत बसून मी प्रथम ज्या दिवशी अध्यक्षपदाला उभा रहाण्याचा निर्णय घेतला त्या दिवसाला लाखोली वाहिली असती."

# समाप्त



# गुलाबी प्रकाशात बोलक्या लेखण्या

सुहास भालचन्द्र बापट

प्रवासवर्णन हा वाङ्‌मयप्रकार मराठीत आता बऱ्यापैकी रुळला आहे असे म्हणायास हरकत नाही. परदेशी जाऊन आलेल्या प्रथितयश व्यक्तीने तरी निदान आपले प्रवासवर्णन लिहावे असा एक अलिखित संकेतच पडत गेला आहे. 'महाबळेश्वरवर्णन' अथवा 'माझा युरोपचा प्रवास' यासारख्या प्रवासवर्णनातील रुक्षपणा केव्हाच लोप पावला आहे. आणि आपले प्रवासवर्णन अधिकाधिक 'ललित' व्हावे यासाठी आवर्जून प्रयत्न केले जात आहेत. यापैकी सगळेच प्रयत्न यशस्वी झाले आहेत असे नाही. विनोदाच्या शेंदुराने मूळचा मारुती नाहीसा करण्याचे 'कार्य' भल्याभल्यांकडून घडले आहे.

अनंत काणेकरांचे वरील शीर्षकाचे प्रवासवर्णन हे वर उल्लेखिलेल्या संकेताचे आणखी एक उदाहरण होय. (हे शीर्षकच लांबलचक प्रवासाची आठवण करून देते. हे थोडे जाताजाता) युगोस्लाव्हियातील ब्लेद या गावी भरलेल्या P. E. N. (पेन) या आंतरराष्ट्रीय लेखक-टीकाकार संघटनेच्या वार्षिक कॉंग्रेसला भारतातर्फे काणेकर गेले होते. त्या प्रवासाचा हा धावता वृत्तान्त. अथेन्स, ब्लेद, लंडन, पॅरिस आणि रोम ही प्रवासातील मुख्य ठिकाणे, विशेषतः अथेन्स, व ब्लेद.

पुस्तकातील वर्णनाचे चार भागात विभाजन केले आहे. मुंबई ते अथेन्स हा प्रवास पहिल्या भागात, दुसऱ्या भागात अथेन्स नगरीचे वर्णन, तिसऱ्या भागात परिषदेचा वृत्तान्त आणि शेवटच्या भागात लंडन, पॅरिस व मुंबई हा परतीचा प्रवास असा हा वर्णनक्रम आहे.

हे प्रवासवर्णन एकूण भलतेच साधेसुधे आहे. इतके साधेसुधे की अनेकदा ते रुक्ष, गद्य, माहितीपर आणि कंटाळवाणे असे वाटते. पुस्तक वाचून पूर्ण केल्यावर हा रुक्षपणाच मनावर ठसतो. अतिशय संथ, संवेदनाविरहित अशी स्थलवर्णने आणि व्यक्तिवर्णने या रुक्षपणाला जबाबदार आहेत. त्यांना 'वर्णन' म्हणणे हेही गौरवाचेच ठरेल इतके ते धावते लेखन आहे. पुस्तकाचा बराचसा भाग हा असा प्रायः गद्यपर आहे. रिपोर्टवजा आहे.

जेथे लेखक जाणवतो अशी ठिकाणे फारच थोडी, अशा ठिकाणी काणेकरांच्या मिश्किल पण संयत अशा विनोदबुद्धीचा प्रत्यय येतो. ही विनोदबुद्धी अतिशय हळुवार असे रेशमी चिमटे संबंधितांना काढते आणि वाचकांच्या गालाला खळी पाडते. चेंगट एअर इंडिया, अगाध महिमावाली रिझर्व्ह बँक, तुर्की कॉफी, नाविन्याचे श्रेय उपटण्यासाठी काहीबाही दुर्बोध लिहिणारे ' अभिगुप्त ' लेखक या अशा प्रकारचे चिमटे बसलेल्या ' कन्सर्न्ड पार्टीज् ! ' या लेखनात विसावा वाटण्यासारख्या जागा त्या एवढ्याच !

या जागांबरोबरच काणेकरांचा लेखक म्हणून प्रामाणिकपणा भलताच आकर्षक. आपल्याला जे कळत नाही ते ' कळलं नाही ' म्हणून ठणठणीतपणे लिहिण्याचे धैर्य काणेकरांनी या प्रामाणिकपणाच्याच बळावर दाखविले आहे, एरवी हे ' न कळणे ' सुललित शब्दांच्या सुकुमार झेल्यात ' गुंडाळणे काणेकरांसारख्या लेखकाला अवघड नाही. तसे त्यांनी केले नाही म्हणून मनःपूर्वक अभिनंदन ! त्यांचे हे ' न कळणे' भाषेतील आहे, नाटकातील आहे, पाश्चात्य संगीतातील आहे. परदेशी जाऊन आलेला आणि तरीही ' या अमुक अमुक गोष्टी मला कळत नाहीत बुवा ' असे म्हणणारा लेखक किती जवळचा वाटतो म्हणून सांगावे ! आता ' मला कळत नाही ' असे म्हणणे हेही काणेकरांच्या विनयाचा भाग असू शकेल, नाही असे नाही; पण त्या स्थितीत ' संभावित ' हे विशेषण लावण्यापलीकडे आपण सामान्य वाचक कोणती दुसरी संभावना करू शकणार ? या प्रामाणिक काणेकरांबरोबरच ग्रीक ध्वनिप्रकाशनाटच पहाताना ' महाराष्ट्राचा दिव्य पूवकाळ ' असा कधी बरे उजळेल ' असे म्हणून हळहळणारे आशावादी काणेकर, शेलेच्या समाधीवर कोमेजलेली निळी फुले हळच वहाणारे भावव्याकुल काणेकर—ही काणेकरांची इतर व्यक्तिरूपेही लक्षात रहातात.

या प्रवासात काणेकरांची कपड्यांची बॅग हरवली हा आणखी एक उल्लेखनीय प्रसंग. तो प्रसंगही त्यांनी रंगवलेला नाही. पण तो मूळतःच मजेशीर असल्यामुळे लक्षात राहतो.

बाकी हे प्रवासवर्णन भलतेच अनाकर्षक. लघुनिबंधकार काणेकरांनी ज्यावर लिहावे अशा काही वैचारिक गोष्टींना तरी या प्रवासवर्णनात निश्चित स्थान होते. उदाहरणार्थ ' पेन ' सारख्या आंतरराष्ट्रीय (अथवा इतर आंतरप्रांतीय सुद्धा) लेखक परिषदांना हजर राहून लेखकाचा लेखक म्हणून काही फायदा होतो का ? फायद्यातील व्यावहारिक भाग आपण सोडून देऊ. पण मानसिक भागाचे काय ? अशा परिषदांच्या फलिताचा पुसटसा उल्लेखसुद्धा या प्रवासवर्णनात येऊ नये याचे आश्चर्य वाटते. महाराष्ट्राच्या दिव्य पूर्वकाळाची आठवण होऊन सद्गदित झालेले काणेकर आपण वरती पाहिले आहेत. पण शिवशाहीच्या संदर्भात या सगळ्या काळाला ' दिव्य ' म्हणता येईल का या प्रश्नाचा साम्यवादी (एकेकाळचे

असले म्हणून काय झाले!) काणेकरांनी विचार केलेला दिसत नाही. मिहालॉव्ह या युगोस्लाव्ह लेखकावर झालेल्या खटल्याच्या निषेधाचा ठराव काणेकरांच्या एका मित्राने परिषदेत आणला होता. पण परिषद सुरू होण्याच्या दरम्यानच्या काळात मिहालॉव्हची शिक्षा स्थगित झाल्याचा निर्णय कोर्टाने दिला. काणेकरांनी या घटनेवर लिहिलेली दोन भाष्यपर वाक्ये अशी: 'त्यामुळे हा ठराव आणण्याची आवश्यकता उरली नाही;...सुदैवाने तो ठराव काँग्रेसमध्ये आणावा लागला नाही ही गोष्ट वेगळी' (पृ. ५ व ४)

काणेकरांची ही दोन्ही वाक्ये मला निश्चितपणे आक्षेपार्ह वाटतात. ठराव दस्तुर खुद्द काणेकरांचा नव्हता. तरीपण काणेकरांकडून या घटनेवरील परखड मत अपेक्षित होते. एखाद्या लेखकाला शिक्षा झाली म्हणजेच फक्त अन्याय झाला असे म्हणायचे का? खटला भरला जाणे आणि तोही राजकीय कारणासाठी, हा अन्याय नव्हे का? की राजसत्तेला असे काहीही करण्याचा नैतिक मुक्त हक्क आहे? या प्रश्नांची काणेकरांनी उत्तरे दिली नाहीत. कारण ते प्रश्न त्यांच्या मनाला शिवले नसावेत. असल्यास त्या प्रश्नांना दूर पिटाळले गेले असावे, तसेच हा ठराव काँग्रेसमध्ये आणावा लागला नाही यात 'सुदैव' ते कसले? 'समजा हा प्रश्न उपस्थित होता तर असा काय अनवस्था प्रसंग ओढवला असता? की न्याय्य कलह लेखकाला मानवला नसता? काणेकरांच्या व्यक्तिमत्त्वातील ही 'गोडीगुलाबी' प्रसगी अन्यायकारक आहे.

तर असो. 'गुलाबी प्रकाशात बोलक्या लेखण्या' हे जडजंबाल शीर्षक धारण करणारे हे लेखन एकण निराशाजनक आहे संक्षिप्तता, मुग्धता ही त्याच्या अपयशाची काही कारणे आहेत; प्रवासासारख्या गतिमान अनुभवाला हे लेखन न्याय देत नाही.

आणि तरीही ते प्रामाणिक सीधेसाधे आहे असे म्हणावयाचे असेल (तसे आहे असे मला वाटते) तर प्रवासलेखनाचा हा सगळा प्रपंच फुकटच ठरला आहे असे मी समजेन. काणेकर प्रवासलेखनाच्या सकेताला बळी पडले आहेत असे म्हणावे लागेल, आणि जाहिरातही द्यावी लागेल—

'—' लेखक'.हरवला आहे!'

□ □ □

गुलाबी प्रकाशात बोलक्या लेखण्या
अनंत काणेकर
पृ. ९८; सोमैया पब्लिकेशन्स, मुंबई
मूल्य पाच रुपये

# चिअऽऽर तेंडुलकर

डॉ. श्रीराम लागू

पोरांचा खेळ चालला आहे. घरात काहीतरी चमचमीत पदार्थ बनवला जातो आहे आणि तो तयार होईपर्यंत कसातरी वेळ काढायचा आहे. टाईम पास करायचा आहे. कसला खेळ खेळावा या विचारात पोरे असतानाच खोलीतल्या फळीवर त्यांना एक गोजिरवाणी चिमणी दिसते. त्या चिमणीला पकडावे—खेळ चांगला जाईल अशी कल्पना निघते आणि खोलीची दारे-खिडक्या बंद केली जातात. प्रथम थोडेसे घाबरत, दबकत पोरे चिमणीभोवती गोळा होतात. कुणी हळूच खडा मारतो, कुणी काटकोने टोचू पहातो. चिमणी प्रथम खेळाचाच भाग म्हणून अजाणतेपणी खेळत सामील होते. मग पोरे हळूहळू धीट होत जातात. कुणीतरी त्या चिमणीचे पीस उपटतो. आणि मग साऱ्या पोरांच्या डोळ्यांत खून चढू लागतो. चिमणी घाबरून जाते. भयंकर भेदरून जीवाच्या कराराने ती निसटू पहाते. पण दरवाजे बंद असतात. खेळणारी पोरे पद्धतशीरपणे चिमणीला पकडतात. तिचे पीस न् पीस उपटून तिला रक्तबंबाळ करतात. आणि तेवढ्यात घरातून आईची हाक आल्याबरोबर, त्या चिमणीला रक्तबंबाळ अवस्थेत तिथेच टाकून, सगळा क्रूर खेळ एका क्षणात विसरून, तो चमचमीत पदार्थ खायला चालती होतात. वेळ मजेत गेलेला असतो. खाण्याच्या आधी आता फारतर हात धुवावे लागतील !

पण एक चिमणी रक्तबंबाळ होऊन तिथे पडली असली तरी खेळ संपलेला नाही; अशा अनंत वेळा यायच्या आहेत, आणि चिमण्याही अनंत आहेत; टाईम पास करण्याकरता समाजाकडून क्रूरपणे अनेक जीव रक्तबंबाळ व्हायचे आहेत; तेव्हा, शांतता ! खेळ चालू आहे !

समाज न्यायावर अधिष्ठित आहे, न्याय कायद्यावर आधारलेला आहे आणि कायदा गाढव आहे ! (पण म्हणून समाज गाढवपणावर आधारलेला आहे हे पूर्ण-सत्य नाही; कारण गाढव नुसतेच निर्बुद्ध असते. ओडीला क्रूर नसते.) परंपरागत

आचार-विचार आणि बुरसटलेल्या रूढी हेही समाजाचे अलिखित कायदेच आहेत. या आचार-विचारांच्या आणि रूढींच्या चौकटी जाणते अगर अजाणतेपणी फोडून बाहेर पाऊल टाकणारा माणूस समाजात शिक्षेला पात्र आहे !

न्याय-अन्यायाचा हा भयानक खेळ खळणाऱ्या समाजाच्या न्यायालयात एक खटला चालू आहे. शरीराच्या शरीरपणाचा शाप असलेल्या एका मनस्वी मुलीवर हा खटला भरला गेलेला आहे. न्याय-अन्यायाची कुणाला चाड आहे, किंवा त्या निमित्ताने काही सनातन मूल्ये तपासली जातील म्हणून काही हा खटला भरला गेलेला नाही. तर ठराविक चाकोरीतील जीवन जगून कंटाळलेल्या, थांबून गेलेल्या समाजाने केवळ विरंगुळा म्हणून हा एक खेळ सुरू केलेला आहे. खेळाचा शेवट होतो यात कुणालाच तसा रस नाही. टाईम पास करायचा आहे. खटला जितका अधिक सनसनाटी होईल तितका वेळ अधिक चांगला जाणार आहे.

सारेच या खेळात सामील आहेत. विश्वरहस्याचा शोध घेऊ पहाणारे शास्त्रज्ञ आहेत. समाजाच्या स्थैर्याची धुरा खांद्यावर वाहणारे न्यायशास्त्री आहेत. जीवनाच्या हेतुशून्यतेची खात्री पटलेले तत्त्वज्ञ आहेत. आला दिवस ढकलणारे बघे आहेत. स्वतःच्या अहंकाराकरता पिळणूक करणारे आहेत. आणि पिळले जाणारेही आहेत.

आरोपीच्या पिंजऱ्यात एक खळखळून हसणारी, निरागस पण मनस्वी मुलगी (बाई !) आहे. कुणाचेच तिने काहीच वाकडे केलेले नाही. स्वतःच्या वाट्याला आलेली अथांग वेदना उरात लपवून हसतमुखाने जगण्याचा ती प्रयत्न करते आहे; आपल्या मनाला करपवून टाकणाऱ्या निराशेचा स्पर्शही आपल्या विद्यार्थ्यांना होऊ नये म्हणून सारखी जपते आहे. जीवनावर नितांत प्रेम करणारी ती मुलगी आहे. पण पिढ्यान्‌पिढ्या समाजाने उराशी बाळगलेल्या काही नीतिकल्पनांशी विसंगत असे काही वर्तन तिच्या हातून घडले आहे हा तिचा भयंकर अपराध आहे. आणि त्या निमित्ताने तिला न्यायासनासमोर खेचण्यात आले आहे.

न्याय-अन्याय, नीती–अनीती या भानगडीत तसा कुणालाच रस नाही. टाईम पास करण्याकरता हा खटला चालवायचा आहे, तेव्हा आरोपीचे जितके अधिक वाभाडे निघतील, जितके अधिक लचके तुटतील, जितके अधिक रक्त गळेल, तितकी खेळाला अधिक मजा येणार आहे. इकडेतिकडे विखुरलेली पिसे, रक्ताचे लालभडक डाग, कोथळा बाहेर पडलेला देह बघायला मिळाला की, चाकोरीतल्या, मुर्दाड आयुष्यातला एक क्षण तरी थरारून जाणार आहे, मग त्याकरता कुणाचा बळी जाणार आहे याची क्षिती कशाला ?

असा हा एक आसुरी, अमानुष (किंवा खरे म्हणजे, मानवी) खटला आहे. पण असे अनंत खटले चालायचे आहेत. अनंत आरोपींचे रक्त वहायचे आहे. तेव्हा, शांतता ! कोर्ट चालू आहे !

असा हा अतिशय अस्वस्थ करणारा, भयानक आशय ज्या नाटकात सांगितला

आहे त्या नाटकाचे नाव आहे "शांतता! कोर्ट चालू आहे." लेखक आहेत विजय तेंडुलकर (आणि ज्या रंगभूमीवर हे नाटक धडपणे चालूही शकत नाही, ती रंगभूमी आहे, अखिल भारतातली अग्रेसर मराठी रंगभूमी!)

आपल्या भावतीभोवती प्रत्यही दिसणारी केवळ पाच-सहा पात्रे घेऊन तेंडुलकरांनी या मुर्दाड समाजाचे मोठे प्रत्ययकारी चित्र आपल्यापुढे उभे केले आहे. सर्वसामान्य माणूस आयुष्यात बोअर झालेला आहे. त्याचे आयुष्य सामान्यपणे इतक्या क्षुद्र पातळीवरून वाहते आहे की 'अभिरूप न्यायालया'सारखा एखादा भुक्कड कार्यक्रम ही सुद्धा त्यातली एक चित्तथरारक घटना आहे. या असल्या कार्यक्रमाची वाट पाहत असताना आलेला कंटाळा सहन करण्याइतकीही ताकद त्यांच्या मनात नाही, एका चित्तथरारक घटनेची वाट पाहताना आलेला कंटाळा घालवायलाही काहीतरी विरंगुळा हवा आहे. ही पार मद्दड झालेली मने आहेत; त्यांच्यात थोडीसुद्धा उभारी नाही. एक प्रवाहपतित, हेतुशून्य आयुष्य ती जगताहेत—केवळ जगणे वाट्याला आले म्हणून जगताहेत.

केवळ विरंगुळा म्हणून काढलेल्या खेळात, एका निरागस जीवाला सहज रक्तबंबाळ करण्याइतके जे अमानुष क्रौर्य या समाजाच्या ठिकाणी आहे तेही अगदी अर्थशून्य, हेतुशून्य आहे. काही प्रचंड महत्त्वाकांक्षेपोटी किंवा सुडापोटी सुद्धा आलेले हे क्रौर्य नाही. किंबहुना त्या क्रौर्याच्या भयानकतेची जाणीवही त्या समाजात नाही. केवळ, जीवाची घटकाभर करमणूक एवढाच अर्थ त्या अमानुष क्रौर्याला असला तर आहे. आणि ही त्या समाजाची खरी शोकांतिका आहे.

जो जीव या खेळात रक्तबंबाळ झाला आहे त्याची शोकांतिका तर उघडच आहे-त्याचे रक्तच सांडले आहे. पण त्याहीपेक्षा भयानक शोकांतिका आहे ती ज्या कळपाने त्या जीवाला रक्तबंबाळ केले त्या कळपाच्या मुर्दाड मनाची. मानसिक हिजडेपणातून त्या कळपाची सुटका नाही. हे खेळ असेच चालायचे आहेत. आज एका बेणारेबाईचा बळी गेला असला तर उद्या एखाद्या पोंक्षेची किंवा काशीकराचीही पाळी येणार आहे; आणि हे दिसत असूनही आज बेणारेचा बळी घेण्याच्या खेळात पोंक्षे आणि काशीकर भाग घेणारच आहेत. टाईम पास होतो आहे तोवर चिंता नाही! प्राणांमागून प्राण चिरडून टाकण्याइतके क्रौर्य आपल्या ठायी आहे याची कुणाला दखलही नाही! आणि केवळ वेळ घालवणे, आला क्षण पुढे ढकलणे, एवढेच क्षणिक निमित्त त्या क्रौर्याला असले-तरी प्रत्यक्ष त्या क्रौर्यात क्षणिक असे काहीच नाही; ते अनंत आहे; अनंत काळपर्यंत, अनंत जीवांचे बळी ते घेत रहाणार आहे!

हा असला भयानक आशय ज्या सामर्थ्याने या चिमुकल्या नाटकाने पेलला आहे तेही कौतुकास्पद आहे.

नाटकाच्या सुरुवातीला आपल्याला एक आत्मकेंद्री, खूप संवेदनाशील, बरीचशी

बुद्धिमान अशी एक मुलगी दिसते. लीला बेणारे तिचे नाव. ती बावरलेली आहे, अस्वस्थ आहे हे उघड आहे; पण सतत स्वतःला सावरत खळखळून हसणारा चेहरा तिने धारण केलेला आहे हेही उघड आहे तिचे बोलणे-चालणे थोडे वाह्यातपणाकडे झुकत असले तरी त्यात लहान मुलाची निरागसता आहे. एकूण ही मुलगी आपल्याला आवडते—एखादे अवखळ लहान मूल आवडावे तशी.

मग तिच्या भोवतालच्या एकेका व्यक्तीची आपली ओळख होत जाते. ह्या साऱ्या व्यक्तींविषयी आपल्याला तसे फारसे काही कळत नाही. पण 'अभिरूप न्यायालय' हा कार्यक्रम रात्री सादर करण्यासाठी ही मंडळी मुंबईहून या आडगावी आलेली दिसतात. रात्री ज्या हॉलमध्ये हा कार्यक्रम व्हायचा आहे त्याच हॉलमध्ये सारे जमले आहेत. कार्यक्रम सुरू व्हायला काही तासांचा अवधी आहे. तो काळ कसा-बसा काढायचा आहे. अशा परिस्थितीत जे ढिले, indifferent वातावरण असते ते जवळजवळ पहिला अंकभर दिसते. विशेष काहीच करता येण्यासारखे नसते—मग कुठे गप्पा मार, कुणाच्या उखाळ्यापाखाळ्या काढ, चहा पी, पान खा, सिगरेटी ओढ असले काहीतरी फालतू उद्योग करत वेळ काढायचा असे चालले आहे. यापेक्षा अधिक बऱ्या तऱ्हेने वेळ गेला तर सर्वांनाच हवा आहे. रात्री होणाऱ्या कार्यक्रमाची एक तालीम करावी अशीही एक कल्पना निघते. पण, फार वेळा तोच कार्यक्रम उगाळला तर रात्रीचा कार्यक्रम साफ पडेल म्हणून ही सूचना बाजूला पडते. मग कुणाला कल्पना सुचते की एक काल्पनिक खटला उभा करायचा आणि तो खऱ्या खटल्यासारखा लढवायचा. मात्र त्यात पूर्वनियोजित काही नाही. कोर्टाचे नियम पाळून, आयत्यावेळी सुचेल त्या पद्धतीने खटला रंगवत न्यायचा. कल्पना सगळ्यांना पसंत पडते. या प्रकारे टाईम चांगला पास होईल याबद्दल एकमत होते.

कल्पना मूळ धरते आहे असे दिसताच तिथल्या एकदोघात लीला बेणारेबद्दल काही कुजबूज होते. तिच्या हातून काहीतरी घडू नये ते घडले असावे असे वाटते, आणि त्याकरता, आरोपी म्हणून तिलाच या खटल्यात ओढावे असा सगळ्यांचा कट ठरतो. सर्वांप्रमाणे बेणारेसुद्धा कंटाळलेलीच आहे. तो कंटाळा जाण्याकरता ती 'लंगडीसुद्धा घालायला तयार' आहे. तीही या खेळात सामील होते. वेळ तरी चांगला जाईल; नाहीतरी चकाट्या पिटत दोन तीन तास घालवायचे-त्यापेक्षा एक नवीन मजेशीर खेळ खेळायला मिळेल, असा तिचा हिशेब.

अशा या रेंगाळत पुढे जाणाऱ्या, मधूनमधून कंटाळवाण्या, मधूनमधून पाचकळ, थोड्याफार ढिसाळ अशा पहिल्या अंकाच्या शेवटी एकदम एखादी चपराक बसल्या-सारखा बेणारेवरचा आरोप सादर केला जातो, "आरोपी मिस् बेणारे, इंडियन पिनल कोडच्या ३०२ कलमाखाली तुमच्यावर भ्रूणहत्येचा आरोप ठेवण्यात आलेला आहे सदरहू आरोप तुम्हास मान्य आहे की अमान्य ?"

अनपेक्षित झालेल्या या हल्ल्याने बेणारे एकेदम गांगरून जाते. सगळे तिच्याकडे

स्तब्धपणे रोखून पहात राहतात. बेणारे ज्याअर्थी एकदम इतकी सुन्न झाली आहे त्याअर्थी नक्कीच तिच्या हातून काहीतरी घडले आहे. तिने खरोखरीच भ्रणहत्या केली आहे ? My God ! आणि ही मुलगी आपल्याला आवडली होती–निरागस वाटली होती !

फारसे विनोदी नसलेले एक विनोदी नाटक आपण पहात आहोत या कल्पनेने पेंगू लागणाऱ्या प्रेक्षकांना अशी एक झणझणीत चपराक चढवून, खाडकन् जागे करून पहिला अंक संपतो.

दुसऱ्या अंकाच्या सुरुवातीला आपली उत्कंठा ताणलेल्या अवस्थेतच असते. आता आपल्याला बेणारेसंबंधी काहीतरी रहस्यमय बघायला अगर ऐकायला मिळणार अशी आपली खात्री असते. प्रथम प्रथम विनोदी, खेळकर वाटणारे नाटक इथून पुढे रहस्यमय होणार अशी आपली कल्पना होते. आणि अंकाच्या सुरुवातीलाच केल्या जाणाऱ्या बेणारेवरच्या आरोपाच्या पुनरुच्चाराने आणि त्यामुळे पसरलेल्या गंभीर तंग वातावरणाने त्या आपल्या कल्पनेला दुजोराच मिळतो. एक रहस्यमय नाटक पहायला आपण सरसावून बसतो न बसतो तोच मसाला–पान, नि सिगरेट-पाकिट घेऊन सामंत प्रवेश करतो–आणि नाटक एकदम पहिल्या खेळकर विनोदी पातळीवर जाते. (जखमी होत जाणाऱ्या बेणारेची अतिशय तंग मनोवृत्ती आणि खेळ खेळणाऱ्या इतरांची त्या प्रकाराकडे पहाण्याची हलकी फुलकी मनोवृत्ती या दोन भिन्न पातळ्यांवर या नाटकाने सतत केलेला प्रवास हा या नाटकाच्या रचनेचा अतिशय हृद्य आणि सामर्थ्यशाली असा कणा आहे. याविषयी खूपच लिहिण्यासारखे आहे, पण स्थलाभावी ते अशक्य आहे. असो.)

हा केवळ एक खेळ चालू आहे, यात गंभीर असे काहीही नाही हे आपल्याला पुन्हा पुन्हा जाणवून दिले जाते. आरोपीच्या पिंजऱ्यात उभी असलेली बेणारेसुद्धा एकदम स्वतःला सावरून मनावर अचानक झडप घालून आलेले जीवघेण्या विचारांचे सावट बाजूला सारून त्या खेळात सामील होते. खेळ पुन्हा सुरू होतो. 'भ्रूणहत्या, मिलॉर्ड, कोर्टाचं कामकाज, आरोपीला समज, अशीलाला घातक कोर्टाची बेअदबी, गंभीर निर्णय, मालमत्तेचा अपहार' असले कायद्याच्या कामकाजाशी संबंधित शब्द एखाद्या चेंडूसारखे इकडून तिकडे उडवले जातात. 'मातृत्व हे मंगल असतं, मातृत्व पवित्र आहे, मातृत्वाच्या आपल्या कल्पनेमागं एक फार मोठी उदात्तता आहे, मातृदेवो भव, जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी' असल्या वापरून वापरून विटलेल्या रंगीत टोप्या सगळ्यांना घालायला दिल्या जातात आणि खेळ रंगात येतो.

बंद खोलीत पोरांच्या घोळक्यात सापडलेल्या एखाद्या चिमणीसारखी बेणारे इकडे तिकडे भिरभिरते. आपल्यावरच्या संकटाची पुरती जाणीव न झाल्याने अभावितपणे त्यांच्या खेळात सामील होते. सैरभैर भिरभिरताना मधेच कुणालातरी

चुकून तिची चोच लागते. आणि थोडासा घाबरून, थोडासा सूडबुद्धीनं तो कुणीतरी तिचं एक पीस कचकन् उपटतो. रक्ताचे चार थेंब ठिबकतात आणि बेणारे कळवळते.

पण पोरांना आता अधिक मनोरंजक खेळ मिळाला आहे. चिमणीला नुसते इकडून तिकडे भिरभिरायला लावण्यापेक्षा तिचो पिसे उपटण्यात, गळणारे लाललाल रक्त बघण्यात आणि तिचे केविलवाणे चीत्कार ऐकण्यात अधिक मजा आहे! खेळाला अधिकाधिक रंग येतो आहे.

बेणारेला आता आपल्यावर कोसळणाऱ्या संकटाची जाणीव झाली आहे. हा तथाकथित खेळ तिचे रक्त काढतो आहे. ही जाणीव झाल्याबरोबर ती जिवाच्या कराराने खोलीबाहेर उडून जाऊ बघते आहे– पण दार बंद आहे. ते आता उघडणारच नाही. कारण " बाहेरसुद्धा यावेळी कुणी नसणार ?" सारेच आत आहेत! पिसे उपटण्यात आणि वाहणारे रक्त पाहण्यात रंगून गेले आहेत. त्याबाहेर कुणीच नाही ! बणारे पुरती अडकली आहे.

आणि तिची असहाय्यता बघून खेळाचे रूपच एकदम पालटले आहे. खेळणारांच्या डोळ्यांत खून चढू लागला आहे. संपूर्णपणे त्यांच्या तावडीत सापडलेल्या त्या असहाय्य पाखराकडे पाहून सारे जिभल्या चाटू लागले आहेत. " एकाग्रतेने कान कोरताहेत, विकृत उत्साहाने वाकताहेत, डोळे चमकताहेत. "

दुसऱ्या अंकाच्या शेवटी, लवलवणाऱ्या जिभा आणि खून चढलेले, चमचमणारे डोळे तेवढे दिसत रहातात – आणि एक भेदरलेली असहाय्य चिमणी !

हा खेळ, खेळणारांना खून आता इतका चढला आहे की मला वाटते, तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीला या सर्वांचे चेहरेसुद्धा बदललेले दिसतात. डॉ. जेकीलचा हाइड होतो तसे काहीसे. कुणाला लांडग्यासारखे सुळे फुटलेले दिसले आणि कुणी जिभल्या चाटीत तोंडाला लागलेले रक्त चाटत असलेला दिसला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही !

खेळाने आता भलतेच गंभीर स्वरूप धारण केले आहे. 'प्रभावी ठरावे' म्हणून न्यायमूर्ती काशीकरांनी गाऊन धारण केला आहे, वकील सुखात्मे कुलदैवताची प्रार्थना करून 'कार्याला' निघाले आहेत. अखेरचा घाव घालून बेणारेचा पार चक्काचूर करायचा आहे. कार्य महत्त्वाचे आहे, तेव्हा कुलदैवताची प्रार्थना केलीच पाहिजे. सगळ्यांच्याच डोळ्यात इतका खून चढला आहे की, आता क्षणाचाही विलंब – कुणाला सहन होत नाही. न्यायमूर्ती हुकूम देतात " गो ". दुसरा एक कर्णिक ओरडतो " फायर. "

खेळातला खटला म्हणून हा सुरू झालेला असला तरी हा आता खेळही राहिलेला नाही. आणि खटलाही राहिलेला नाही. बेणारेवरचे आरोप खरे की खोटे याची शहानिशा या कोर्टाला करायची नाही. तिचे एकेक पीस उपटून तिला पार रक्त-

संबाळ करायची एवढाच हेतु आता उरला आहे. झक्कपैकी टाइम पास करण्याच, तोच खरा मार्ग आहे!

आपले सामाजिक, कायदेशीर, नैतिक सुळे परजत ही सारी मंडळी आता अतिशय वेगाने, अगदी उतावळेपणाने बेणारेचे लचके तोडताहेत. तिचे वय बत्तीस का चौतीस असूनसुद्धा तिने अजून लग्न का केले नाही? कशाला करील? "लग्नाशिवाय सगळं काही मिळालं म्हणजे असं होतं!" ती पुरुषांबरोबर फार फ्री वागते, हसते काय, गाते काय, नाचते काय, कुणाकुणाबरोबर एकटी फिरते काय! आपल्यापेक्षा वयानं लहान असलेल्या बाळू रोकडेशी तिने अंधारात लगट केली, त्याला लग्नाची मागणी घातली, आपलं हे पापाचरण लपवण्यासाठी तिनं त्याला धमकी दिली. दुसऱ्या कुणा एका पोंक्षेलाही तिनं लग्नाची गळ घातली. प्रो. दामले नावाच्या माणसावर आपलं प्रेम असून त्याच्यापासून आपल्याला दिवस गेले आहेत, पण दामले हा संसारी माणूस असल्यामुळे आपल्याला त्याच्याशी लग्न करता येणं शक्य नाही, त्यानं आपल्याला झिडकारलेलं आहे, पण केवळ आपलं मूल जगवण्याकरता आपल्याला लग्न करायचं आहे असं सांगून तिनं पोंक्षेला लग्नाची गळ घातली. आत्महत्या करण्याकरता ती आपल्याजवळ टिक ट्वेंटीची बाटली बाळगते. तिन वयाच्या पंधराव्या वर्षी प्रत्यक्ष आपल्या मामावर प्रेम केलं होत, ते असफल झाल्यावर आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता, सध्या आपल्याला दिवस गेलेले असून त्यामुळे आपली शिक्षिकेची नोकरी जाईल या भयान तिनं वरिष्ठांकडे वशिले लावायला सुरुवात केली आहे; पण त्याचा उपयोग न होता, अनैतिक वर्तनाकरता तिला तिच्या नोकरीतून बडतर्फ केलेलं आहे! हे सारे घाव बेणारेवर अत्यंत निर्घृणपणे घातले जातात.

आणि बेणारे अत्यंत असहाय्य अवस्थेत तिथे घुसमटत बसली आहे. मधूनच एखादा चीत्कार तिच्या तोंडून बाहेर पडतो – दुबळा प्रतिकारात्मक चीत्कार. तिला जे सांगायचे आहे, आपल्या वर्तनाचा जो खुलासा द्यायचा आहे तो समजावून घ्यायला मनाचा थोडासा ओलावा आवश्यक आहे, थोडा हळुवारपणा आवश्यक आहे, मनाचा मोठेपणा आवश्यक आहे. पण तिच्यावर घाव घालत रहाणारांचा तिच्या वर्तनाकडे पहाण्याचा दृष्टिकोन इतका कोता, उथळ, आणि सहानुभूतिशून्य आहे की, त्यांना काही सांगण्याचा प्रयत्न करण्यातही अर्थ नाही. त्यांना ते समजणारच नाही. म्हणून बेणारे नुस्तीच घुसमटत, गुदमरत बसली आहे. खरे म्हणजे तिच्या मनाला उधाण आले आहे. तिला खूप बोलायचे आहे. कोंडमारा अगदी असह्य झाल्यावर ती एकदा उतू गेल्यासारखे भडाभडा बोलतेही – पण ते स्वतःशी! तिच्या आसपासच्या मंडळींचा तिचा संपर्कच तुटला आहे. Communication च संपले आहे.

अशा भयानक अवस्थेला हा खेळ येऊन पोचतो आणि एकदम कुणालातरी

आठवण होते की, आपण जो कार्यक्रम सादर करायला इथे आलो त्याची वेळ होत आली आहे, तेव्हा हा खेळ आता थांबविणे भाग आहे. आणि एकदम खेळ थांबतो.

वेळ फारच मजेत गेलेला आहे – इतका की वेळेचंही भान कुणाला राहिलं नाही. सगळी मंडळी मोठ्या उत्साही अवस्थेत पुढच्या कार्यक्रमाच्या तयारीला लागतात. आणि बघतात तर बेणारे निपचित पडली आहे. तिने इतके मनाला लावून घ्यावे असे घडले आहे काय, हेच त्यांना कळत नाही. खेळ कुणी मनाला इतका लावून घेतात ? After all it was just a game ! a sheer game ! आणि बेणारेला रक्तबंबाळ अवस्थेत तिथेच टाकून ती मंडळी शांत मनाने चालू लागतात. त्यांना माहीत आहे, अशा अनेक वेळा यायच्या आहेत, मनावर सदैव असलेली मरगळ क्षणभर झटकून टाकण्यासाठी असले चित्तथरारक खटले आपल्याला अनेक वेळा खेळायचे आहेत, त्यात एकादा जीव रक्तबंबाळ झाला म्हणून एवढे मनाला लावून काय घ्यायचे ?

आणि मग एकादा हिरवाजर्द, पेंढा भरून सजवलेला पण अगदी निर्जीव, नपुंसक पोपट आपलेपणाने चिमणीला विचारीत राहतो, "का ग तुझे डोळे ओले ?" हा Impotent Intellectual !

असे हे जबरदस्त ताकदीचे मराठी नाटक सुमारे दोन वर्षांपूर्वी मराठी रंगभूमीवर अवतरले आणि आम्ही मराठी प्रेक्षकांनी ते फेकून दिले. होय फेकून दिले असेच म्हटले पाहिजे, कारण कैक मराठी नाटकांचे शेकड्यांनी प्रयोग व्हावेत, त्यांनी लाखो रुपयांचा धंदा करावा अशी भरभराट असलेल्या मराठी रंगभूमीवर या नाटकाचे, केवळ ते सादर करणाऱ्या संस्थेच्या जिद्दीने, फक्त तीस एक प्रयोग व्हावेत हे आमच्या करंटेपणाचे लक्षण आहे. आज थोडे उशीरा का होईना 'भारतीय नाट्यसंघाने' गेल्या वर्षातले सर्वश्रेष्ठ भारतीय नाटक, असा या नाटकाचा गौरव केला आहे; त्याला पाच हजार रुपयांचे पारितोषिक आणि मोठा मानमरातब दिला आहे. आता तरी या गौरवात आपण सामील होऊ या. 'मराठी रंगभूमीचा विकास होतो आहे' असल्या वांझोट्या शब्दांच्या वावड्या उडवण्यापेक्षा किंवा या नाटकाचा तोंडवळा कुठल्या पाश्चात्य नाटकाशी मिळताजुळता आहे याबद्दल शुष्क बुद्धिबाज चर्चा करण्यापेक्षा किंवा हे नाटक सरकारी नाट्यस्पर्धेत अंतिम फेरीपर्यंतही पोचू नये याकरता क्षुद्र डावपेच लढवण्यापेक्षा आपण मोकळ्या मनाने या प्रचंड नाटकाचा आनंद घेऊ या. मनाला विलक्षण अस्वस्थ आणि उन्नत करणाऱ्या या कलात्मक अनुभवाचा पुरेपूर आस्वाद घेऊ या.

या नाटकात दोष नाहीत असे मला मुळीच सुचवायचे नाही. पण या नाटकाच्या गुण-दोषांची साधक-बाधक चर्चा उपलब्ध स्थलकाळात अशक्य आहे. या प्रसंगी फक्त हातातला पेला उंच करून म्हणायचे आहे, "Cheer तेंडुलकर."

□ □ □

# शांतता !....

## एक समर्थ नाटक

श्री. सत्यदेव दुबे



श्री. विजय तेंडुलकर यांच्या 'शांतता! कोर्ट चालू आहे' या नाटकाचा 'रंगायन' या संस्थेने केलेला प्रयोग जेव्हा पाहिला तेव्हा मी विलक्षण प्रभावित होऊन गेलो. ते नाटक हिंदी रंगभूमीवर आणण्याचे मी ठरविले आणि माझ्या "थिएटर युनिट" या संस्थेतर्फे मी ते हिंदी रंगभूमीवर आणलेही. 'चूप! कोर्ट चालू है' या नावाने.

सौ. सुलभा देशपांडे यांनी हे नाटक हिंदीत दिग्दर्शित केले होते. या नाटकाचा हिंदी अनुवादही आम्ही तिघा-चौघांनी मिळून केला होता. तिसऱ्या अंकाचा अनुवाद मात्र मी स्वतःच केला.

हे नाटक हिंदी रंगभूमीवर आणावे असे मला वाटले त्यात 'रंगायन'ने सादर केलेल्या प्रयोगाचा भाग तसा फारसा नाही. माझ्या मनाला जाऊन भिडले ते मूळ नाटक.

श्री. तेंडुलकरांच्या या नाटकात एक विलक्षण सामर्थ्य आहे. आशयाच्या दृष्टीने आणि फॉर्मच्या दृष्टीनेही. हे नाटक एकाच वेळी दोन पातळ्यांवर वावरत असते. वरवरच्या पातळीवर त्यात एक नाटक चालले असते. लुटुपुटीच्या कोर्टाचे. पण त्याचवेळी आणखीही अत्यंत प्रभावी असा प्रवाह त्यातून वाहत असतो. व्यक्तिगत पातळीवरील क्रूरतेचा. पहिल्या अंकाच्या शेवटी या दोन्ही प्रवाहांचा समतोल सांधला जातो आणि मग एक विलक्षण गतिमान नाट्य त्यातून आकार धारण करू लागते.

कुमारी बेणारेला एका मोहाच्या क्षणी मातृत्व लाभलेले आहे ते लपविण्यासाठी कुणाशी तरी लग्न करून मोकळे होणे एवढाच मार्ग तिच्यापुढे आहे. तिने तसा

प्रयत्नही करून पाहिलेला आहे. पण तो फसला आहे. कुमारी बेणारे या व्यक्ति- रेखेची ही पार्श्वभूमी. साऱ्या नाटकभर आपल्या या 'चुकीचे' समर्थन करणारी तिची केविलवाणी धडपड चालू असते याहून वेगळे ती काही करूच शकत नाही. करू शकणारच नाही. कारण, ती एक मध्यमवर्गीय मुलगी आहे. मध्यमवर्गीय संस्कारांवरच तिचा पिंड पोसला गेला आहे. बंड करणे, आयुष्य उधळून लावणे वगैरे त्या संस्कारांना मानवत नाही. त्यांच्या हिशेबात हे बसत नाही. बसते ते फक्त पळवाटा शोधणे.. आत्मसमर्थनाचा प्रयत्न करणे. कुमारी बेणारे नेमके हेच करते. आणि त्यातूनच तिला एक वास्तववादी जाणीव होते. एक ढोबळ समज येते. या साऱ्या प्रकारात आपल्याला ज्या आत्यंतिक सुखाचा लाभ झाला तो या देहाच्या माध्यमातूनच झाला हे तिला उमगते. आणि आता तर त्यात एक नवा जीव वाढत असतो. त्यामुळे, देहाचे अस्तित्व मान्य करायलाच हवे; इतकेच नव्हे तर ते मान्य करणे भाग आहे, याची तिला जाणीव होते. ही जाणीव होताच तिचा गोंधळ संपतो आणि तिथेच नाटकही संपते. कारण, त्याचे उद्दिष्ट नेमके तिथेच संपले आहे.

आत्मसमर्थनाच्या भरात देहाला दोष देणाऱ्या बेणारेला सुखाचा लाभही देह- ाच्याच माध्यमातून झाला हे वस्तुसत्य स्पष्टपणे उमगले हे दाखवून देणारी तिसऱ्या अंकातील तीन वाक्ये कुमारी बेणारेच्याच नव्हे तर, सर्व नाटकाच्या दृष्टीनेही महत्त्वाची आहेत. किंबहुना हे सारे नाटक साऱ्या दिशांनी त्या तीन वाक्यांकडेच वाटचाल करीत जाते. पण, नेमकी तीच वाक्ये 'रंगायन'च्या प्रयोगात गाळली गेली आहेत. त्यांनी असे का केले, हे मला कळत नाही. माझ्या हिंदी प्रयोगात मात्र मी ती वाक्ये आग्रहाने वापरली आहेत.

या नाटकाचा एकूण परिणाम संमिश्र आहे. असा 'कन्फ्यूज्ड इफेक्ट' हा नाटकाच्या शेवटासंबंधीच्या रूढ कल्पनात बसत नाही. सुखांत आणि दुःखांत अशा ढोबळ कल्पनात हे नाटक बसत नाही. तसे ते कुणी बसवूही नये.

कुमारी मातेला किंवा अविवाहितपणी मातृत्व लाभलेल्या मुलीला समाजाकडून मिळणारी छळवणूक हा या नाटकाचा विषय आहे, असा अनेकांचा गैरसमज आहे. माझ्या मते हे चूक आहे. हा या नाटकाचा विषय नाही. आमच्या प्रेक्षकांना सारे कसे स्पष्ट, निःसंदिग्ध हवे असते. प्रत्येक गोष्टीचा, प्रत्येक व्यक्तिरेखेचा निश्चित असा शेवट हवा असतो. त्यात त्यांचाही फारसा दोष नाही. कारण, त्यांच्या रुचीची व कलाकृतीकडे पाहण्याच्या दृष्टीची जोपासनाच तशी केली गेली आहे. पण, त्यामुळे होते काय की, हा प्रेक्षक वरवरच्या पातळीवरच कलाकृतीचा आस्वाद घेत राहतो. तिच्या अंतर्गर्भात तो जाऊच शकत नाही. 'शांतता! कोर्ट चालू आहे' या नाटकाविषयी निर्माण झालेले गैरसमज या न्यूनतेच्या पोटीच निर्माण झाले आहेत.

या नाटकात रूढार्थाने तशी कोणतीच 'सामाजिक समस्या' (सोशल प्रॉब्लेम) उपस्थित केली गेलेली नाही. कुमारी बेणारेला अविवाहितपणी लाभलेले मातृत्व हे केवळ नाटकाच्या कथावस्तूला गती देणारे कारण आहे. त्यापलीकडे आणखी विशेष त्याचे काही कार्य नाही.

माझ्या मते या नाटकात आहे ती सामाजिक जाण (सोशल कॉन्शसनेस). समाजाचा घटक असणाऱ्या व्यक्तीची क्रूरता हा नाटकाच्या कथावस्तूचा केंद्रबिंदू आहे; आणि याला समस्याच मानायची झाली तर ती चिरंतन आहे. तितकीच अनुत्तरितही!

'फॉर्म'च्या दृष्टीनेही हे नाटक परफेक्ट झाले आहे. श्री. विजय तेंडुलकरांच्या सर्व नाट्यलेखनातून तीन अकी नाटकाचा 'फॉर्म' नेमका पकडण्याची अव्याहत व जाणीवपूर्वक धडपड चालू असल्याचे प्रत्ययास येते. तो 'फॉर्म' या नाटकात त्यांना नेमका सापडला आहे व साधला आहे, असे मला वाटते. रचनेची अशी अचूक बंदिस्त साधली गेलेले त्यांचे दुसरे नाटक म्हणजे 'अशी पाखरे येती' हे होय.

'शांतता! कोर्ट चालू आहे' हे नाटक 'विदेशी' आहे, असा एक आरोप या नाटकावर केला जातो. असा आरोप करणाऱ्यांच्या मनोवृत्तीचे मला आश्चर्यच वाटते. भारतीय माणसाच्या मनात...इथल्या मातीत व इथल्या संस्कारात वाढलेल्या माणसाच्या मनात येणारी प्रत्येक कल्पनाही इथल्याही मातीतलीच असणार! ती विदेशी कशी असू शकेल?

'शांतता! कोर्ट चालू आहे' या नाटकाशी माझे अनेक नात्याने जिव्हाळ्याचे संबंध आले आहेत. हे नाटक हिंदी रंगभूमीवर यावे व ते यशस्वी व्हावे यासाठी निर्माता म्हणून मी सर्वबाजूंनी व सर्वतोपरी खूपच धडपड केली. महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेत आमच्या प्रयोगाला पहिल्या क्रमांकाची बक्षिसे मिळाली... या नाटकात कर्णिकची भूमिकाही मी केली. आणि त्याहून अधिक नाजुक व जिव्हाळ्याचा संबंध म्हणजे माझ्या पत्नीने या नाटकाचा इंग्रजी अनुवाद केला आहे.

आता, हे नाटक पॅरिसच्या रंगमंचावर सादर करायचे घाटते आहे. अर्थातच हिंदीतून!

¤

## आमचे सूर जुळले होते....

सौ. सुलभा देशपांडे

रंगभूमीवर आपण साकार करतो त्या प्रत्येक भूमिकेशी कलावंताचा सूर जुळतोच असे नाही. किंबहुना बहुतेक भूमिका करताना कलावंताला आपले मूळ व्यक्तिमत्त्व आणि त्या भूमिकेचे व्यक्तिमत्त्व या दोघांमधील 'मध्यम मार्ग'

साधावा लागतो. कलावंताचे व्यक्तिमत्त्व व भूमिकेचे व्यक्तिमत्त्व या दोघातील ती तडजोडच असते. कारण, दोघांचेही सूर वेगवेगळे असतात. पण, क्वचित एखादी भूमिका अशीही मिळते की तिचा सूर हाच कलावंताचाही सूर असतो. श्री. विजय तेंडुलकर यांच्या 'शांतता ! कोर्ट चालू आहे.' या नाटकातील कुमारी बेणारेची जी भूमिका मी केली त्या भूमिकेविषयी नेमके हेच घडले आहे. त्या भूमिकेचा जो सूर होता तोच नेमका माझ्याही व्यक्तिमत्त्वाचा सूर होता. त्यामुळ, आम्हा दोघींचे इतके जमून गेले की, ही भूमिका उभी करताना मला कोणताही त्रास पडला नाही अगर कोणतेही खास असे श्रम घ्यावे लागले नाहीत.

'शांतता ! कोर्ट चालू आहे' या नाटकातील कुमारी बेणारे ही शिक्षिका आहे. माझाही व्यवसाय तोच आहे. ती मध्यमवर्गाच्या संस्कारावर पोसली गेली गेली आहे; मीही मध्यमवर्गीय वातावरणातच वाढले आहे. त्यामुळे, कुमारी बेणारे या व्यक्तिरेखेची बुद्धिमत्ता, तिचा, दृष्टिकोण, तिचे व्यक्तिमत्त्व तिच्या मनाची ठेवण, भोवतालच्या समाजात वावरण्याची तिची पद्धत आणि विशिष्ट परिस्थितीला तोंड देण्याची तिची ताकद या गोष्टी मला अपरिचित किंवा अनाकलनीय वाटण्याचे काही कारणच नव्हते. ती मला परकी नव्हती. तिचे सारे गुणदोष हे माझ्या गुणदोषांहून वेगळे नव्हते. तिचा व माझा 'व्हॉइस' एकच होता. त्यामुळे, कुमारी बेणारेची भूमिका करताना, ती भूमिका ही माझीच भूमिका आहे असे मला वाटत होते. आणि म्हणूनच कुमारी बेणारे म्हणून रंगमंचावर वावरताना माझ्या चालण्यात, बोलण्यात, वागण्यात न कळत विलक्षण सहजता आली होती. तिचे संवाद बोलताना, ते प्रभावी व्हावेत, त्यांचा समोर बसून नाटक पाहणाऱ्या प्रेक्षकावर त्यांचा परिणाम व्हावा म्हणून मुद्दाम नाटकीपणा करावा लागत नव्हता. तिच्या भावना, तिच्या व्यथा अभिव्यक्त करताना 'ॲक्टिंग' करावी लागत नव्हते.

कुमारी बेणारेची ही भूमिका 'डेलिकेट' असली तरी खूप कॉम्प्लेक्स आहे, असे मला कधीच वाटले नाही. त्यामुळे, या भूमिकेबद्दल मला जसे भय वाटले नाही तसाच जादा सावधपणा बाळगण्याचीही कधी गरज भासली नाही. माझ्या आजवरच्या भूमिकांत ही भूमिका सर्वात चांगली झाली असे अनेक प्रेक्षकांना वाटले, त्याचे कारण कदाचित हेच असावे.

श्री. विजय तेंडुलकरांनी जेव्हा हे नाटक लिहिले तेव्हा कुमारी बेणारेच्या भूमिकेसाठी मीच त्यांच्या डोळ्यांसमोर होते, असे, त्यांनी स्वतःच कुठेतरी लिहिल्याचे मी वाचले आहे. माझे व्यक्तिमत्त्व आणि माझ्या अभिनयाचा वकूब श्री. तेंडुलकरांना चांगलाच माहिती होता. त्यामुळे, ती भूमिका मला नेमकी फिट्ट बसली असावी.

'शांतता ! कोर्ट चालू आहे' हे नाटक श्री. विजय तेंडुलकरांनी मुद्दाम 'रंगायन'साठी लिहिले होते. त्यांचे लेखन जवळजवळ नाटकाच्या प्रयोगाच्या

दिवसापर्यंत चालू होते. 'रंगायन'ने तालमी सुरू केल्या तेव्हा आम्हा कलावंतांना नाटकाचें कथानक माहिती होते आणि पहिला अंक तेवढा हातात होता. कुमारी बेणारेचे तिसऱ्या अंकातील दीर्घ भाषण तर प्रयोगाच्या दोनतीन दिवस आधी त्यांनी लिहून दिले. त्या दिवशी श्री. तेंडुलकर नाटकाच्या तालमीला आले तेव्हा आम्ही सगळ्यांनी तालीम बंद केली. त्यांना हॉलमध्ये बसवले व आम्ही बाहेर जाऊन उभे राहिलो. तेव्हा मग श्री. तेंडुलकरांनी ती 'सॉलिलॉकी' लिहून काढली. या स्वगतात काही वाक्ये ही पुस्तक छापण्याच्या वेळी समाविष्ट करण्यात आली ती वाक्ये अर्थातच 'रंगायन'च्या प्रयोगात नव्हती. पण, ती वाक्ये नसल्यामुळे, कुमारी बेणारेच्या व्यक्तिरेखेला किंवा नाटकाच्या एकूण परिणामाला काही बाध येतो, असे मला व्यक्तिशः वाटत नाही.

'रंगायन'साठी हे नाटक श्री. अरविंद देशपांडे यांनी दिग्दर्शित केले असले तरी त्यांनी प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याआधी बरेचसे कच्चे काम मलाच करावे लागले. त्यामुळे, 'थिएटर युनिट' या संस्थने जेव्हा हे नाटक हिंदी रंगभमीवर आणायचे ठरवून त्याच्या दिग्दर्शनाची जबाबदारी माझ्यावर टाकली तेव्हा मला दिग्दर्शक म्हणून काही विशेष श्रम घेण्याची किंवा मुद्दाम काही वेगळे करण्याची गरज भासली नाही. 'रंगायन'च्या प्रयोगाबरहुकूम मी 'थिएटर युनिट''चा हिंदी प्रयोग बसवला. त्यातही कुमारी बेणारेची भूमिका मीच केली होती. हिंदीतून हे नाटक बसवताना व त्यात काम करताना भाषेची अडचण येणे अपरिहार्य होते. पण ती बाजू सत्यदेव दुबे यांनी सांभाळून घेतली. आमच्या हिंदी प्रयोगाला त्यावर्षी महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेत पहिल्या क्रमांकाची बरीच बक्षिसे मिळाली.

कुमारी बेणारेची भूमिका करताना या नाटकातील एक गोष्ट मात्र मला सतत खटकत होती. ती म्हणजे तिसऱ्या अंकातील तिचे दीर्घ भाषण. बेणारे अगदी सुरुवातीपासूनच उत्तरे देण्याचे टाळत असते. बरोबर असणाऱ्या माणसांविषयी तिच्या मनात आदर नाही. त्यांचा वकूब तिला माहिती आहे. त्यांच्या मनाची ठेवण आणि माणसाला, माणसाच्या सुखदु:खांना, व्यथा–वेदनांना समजावून घेण्याची त्यांची ताकत किती अल्प आहे, याची तिला पूर्ण जाणीव आहे. त्या खुज्या माणसांना आपल्या व्यथा कळणार नाहीत, असे तिला वाटत असते. त्यामुळे ती स्पष्टीकरण तर देतच नाही. उलट, साऱ्यांची टिंगलच करते. अनेकदा फटकळपणे बोलून त्यांना तोडून लावते. अशी ही निरोगी दृष्टिकोण असलेली मुलगी तिसऱ्या अंकात जे भडाभड बोलू लागते ते योग्य नाही, असे मला वाटते. तिचे ते बोलणे आत्मगत आहे, स्वतःशीच आहे हे खरे आहे. तरीदेखील तिने इतके बोलायला नको... प्रेक्षकांना का होईना असे स्पष्टीकरण द्यायला नको होते. हिंदी आवृत्तीत आम्ही तिचे हे भाषण बरेचसे कमी केले होते.

☐ ☐ ☐



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ◻ वरण-भात खाणे विरूद्ध पैसे खाणे

कॉलेजात शिकत असताना अस्मादिकांनी एकदा असंवद्ध भाषणाच्या स्पर्धेत बक्षीस मिळविले होते. पण हल्ली असंवद्ध भाषणाला कोणी विचारीत नाही. कारण शब्दापेक्षा कृति महत्त्वाची असते या नियमानुसार असंवद्ध भाषणापेक्षा असंवद्ध कृति अधिक महत्त्वाची दिसते. उदाहरणार्थ, धारवाडजवळच्या एका खेडेगावातील गावकऱ्यांनी म्हणे असा जाहीर निश्चय केला आहे की गावात जोपर्यंत विजेचे दिवे येत नाहीत तोपर्यंत दाढी करायची नाही. आता विजेच्या दिव्याचा दाढीशी काय संबंध हे प्रत्यक्ष एडिसनला तरी सांगता येईल काय ? नसेना का, भ्रष्टाचार नष्ट करण्यासाठी उपास करणारे लोक आहेतच की नाही ? पण एकाने वरण-भात खाल्ला नाही तर दुसरा पैसे खाणार नाही असे थोडेच आहे ? तेव्हा सांगायचा मुद्दा काय, हजामत देखील न करीत बसणारे लोक काय दिवे लावणार असे म्हणून उपयोग नाही. उलट विजेचे दिवे हे साध्य तर दाढी न करणे हे साधन या जोडीप्रमाणे इतर अशाच साध्य-साधनांच्या जोडयाही लावता येतील. काही उदाहरणे : भारतीय संस्कृतीचे पुनरुत्थान करण्याचा उपाय : डोक्याला तेल न लावणे. (ब्रिलक्रीम लावायला हरकत नाही, कारण त्यात तेलाचा अंश नसतो.) परीक्षेत पास होण्याचा मार्ग : पुस्तकाला कव्हर न घालणे. (वहीला घातले तर चालेल.) आपल्या प्रांतासाठी पोलाद कारखाना मिळविणे : पायात चपला न घालणे. (बूट घालायला हरकत नाही.) संपूर्ण चंदीगड किंवा बेळगाव मिळविणे : सिगारेट न ओढणे. (विडी चालेल. त्यातल्या त्यात भिकुसा यमासा छाप सिन्नर विडी विशेष लाभदायक.)

## ◻ केसाळ आधुनिकता

१९७० साल सुरू झाल्यापासून नुकत्याच संपलेल्या दशकाला अन्वर्थक विशेषण काय लावता येईल याबद्दल सध्या बरीच चर्चा वर्तमानपत्रांतून वाचायला मिळते. माझ्या मते या कालखंडाचे सर्वात योग्य विशेषण म्हणजे ‘ केसाळ ’. आजकालच्या तरुण मंडळींच्या अगदी ‘ रोमारोमां ’त अधुनिकता भिनल्याचे प्रत्यंतर जसे या दशकात आले तसे इतर कोठल्याच गोष्टीचे आलेले नाही. या दशकात तरुणींचा हेअर-डो हे एक ‘ डोईजड ’ प्रकरण झाले यात तितकेसे नवल नाही. पण तरुणांच्या झिपऱ्यांची लांबीही त्यांच्या अत्याधुनिकतेची ‘ बालंबाल ’ खात्री पटविणारी होती हे विशेष. आता केसाळपणा अन् आधुनिकता यांचा परस्पर-संबंध काय हा

गहन प्रश्न सोडला तरी जो केसाळ तो आधुनिक हे समीकरण एकदा मान्य केल्यावर ही आधुनिकता संपादन करण्यासाठी निसर्गाने साथ दिली नाही तर (केश) कलेचा आश्रय घेणे ओघानेच आले. बायकांसाठी छत्रपती शिवाजी छाप जिरेटोप तयार करण्यासाठी तर प्रत्यक्ष भारत सरकारनेच एक केसांचा कारखाना काढला आहे. त्याच्या जोडीला म्हणे कृत्रिम पापण्याही आपल्या देशात तयार होऊ लागल्या आहेत. या पापण्या लावल्याने डोळ्यांच्या सौंदर्यात भर पडते असा तज्ज्ञांचा सिद्धांत आहे, तेव्हा माझ्यासारखे अज्ञ त्याकडे डोळेझाक करू शकत नाहीत. अन् बायकांना शिवाजी छाप टोप लागतात तर पुरुषांना तानाजी छाप कल्ले हवेतच. हे कल्ले कृत्रिम बनवून ते गालावर चिकटविण्याचीही व्यवस्था झाली आहे, इतकेच काय पण छातीवरचे केस पौरुष दर्शवितात या केसाळ कल्पनेला अनुसरून छातीवर बेमालूम चिकटविण्यासाठी कृत्रिम केसांचे रेडीमेड आच्छादनही म्हणे परदेशात मिळू लागले आहे. आता प्रश्न उरला एकच : ऐसपैस जटा वाढविणारे आपले ऋषिमुनी अतिप्राचीन की तितकेच अर्वाचीन ?

**¤ मासिक " मूर्ख "**

तत्त्वज्ञानाला वाहिलेल्या एका नवीन पाश्चिमात्य नियतकालिकाचे नाव " इडियट इंटर् नॅशनल " ठेवण्यात आले आहे असे परवा वर्तमानपत्रांत वाचले. आता नावात काय आहे असे शेक्सनियरने विचारल्यापासून असे काही तरी होणार याची मला कल्पना होतीच. पण फक्त तत्त्वज्ञानाच्या तेवढे इडियट का म्हणायचे या प्रश्नाचे उत्तर सोपे नाही. तसे पहिले तर इंटरनॅशनल पॉलिटिक्सला वाहिलेल्या मासिकाला ' इडियट इंटर् नॅशनल ' म्हणवून घ्यायचा अधिक अधिकार आहे' असे आपले मला वाटते. ते कांही असो, आता आपण मासिक ' मूर्ख ', साप्ताहिक ' शिवीगाळ ' किंवा दैनिक ' दगावाज ' असे एखादे नियतकालिक काढणार. अन् माजगावकरांना एक अफलातून सूचना : समग्र " माणूस "चे नामांतर करा — " चक्रम माणूस ! "

¤ ¤ ¤


मराठवाडा विद्यापीठाच्या पदवीपूर्व अभ्यासक्रमानुसार लिहिलेले

## सुगम समाजशास्त्र

लेखक : प्रा. उत्तम बा. भोइटे, एम्. ए.

*श्रीशिवाजी महाविद्यालय, परभणी*

मूल्य रु. ६-००  रजि. ट. खर्च रु. १-२०

**व्हीनस प्रकाशन**

३८१ क, शनिवार पेठ, पुणे ३०

 [ पृष्ठ १६ वरून ]

क्रांती म्हणो, कोणी समाजवादी परिवर्तन म्हणो, कोणी अराजक म्हणो, कोणी बंड म्हणो — हे उत्पात अटळ—अटळ आणि अटळ आहेत.

'श्री ४२०' मधली म्हातारी केळीवाली अजून जनता घराची वाट पहात लोअर परळच्या पुलावरती फूटपाथवर बसून केळी विकत आहे. तिचे नाव मी विचारले नाही. तरीपण इतर काही विचारले—समजावले—जे मला समजलं नव्हतं. तंबाखूची पिचकारी टाकत हसून मला ती म्हणाली,

"अरं—जुनी लाल पै पाण्यात डुबायची. आता पाच पैसंबी पोवतात."

तिच्या नकळत चलनवाढीवर तर तिनं टीका केली नसेलना? मला वाटले.

□

कम्युनिस्ट परिभाषेत ज्यांना पेटीबुजर्वा म्हणून हिणवता येईल अशा भाईंदरच्या डॉ. एन. एन. मेहता ह्यांची मुलाखत — त्यांचा स्वप्नाळूपणा, तळमळ, प्रामाणिकपणा व निरपेक्ष विचारपद्धती यामुळे ती दीर्घकाळ माझ्या लक्षात राहील.

"गांधीजींच्या म्हणण्याप्रमाणे काँग्रेस बरखास्त करून त्याचा लोकसेवा संघ करावयास पाहिजे होता. जमीन आणि संपत्तीचे फेरवाटप करायला पाहिजे. आमच्या डॉक्टरी व्यवसायाचेसुद्धा राष्ट्रीयीकरण केले पाहिजे. सर्वोदयी मार्गाने येणारा साम्यवादच देशाला दुःख आणि अज्ञानाच्या खाईतून बाहेर काढेल — बरोबर ना?"

डॉ. मेहेतांना मी नक्षलवाद्यांबद्दल विचारले. ठाणे जिल्ह्यातील मुंबईजवळची काही खेड्यांची परिस्थिती त्यांनी मला कथन केली. रस्ते नाहीत — अन्न नाही — रोजगार नाही. लहानलहान मुलेसुद्धा औषध-पाण्यावाचून मरतात. स्वातंत्र्याच्या वीस वर्षांनंतरसुद्धा पोलिसी दडपशाही व अत्याचार चालूच आहेत. जनतेचे साधे माणुसकीचे हक्क सुद्धा हे सरकार नाकारते. डॉक्टरांचे डोळे पाणावले.

"नक्षलबारीमध्ये लोकांनी जगण्याकरीता बडे केली तर त्यांना बंदुकीच्या गोळीने नाही, तर दोन वेळच्या रोटीने उत्तर दिले पाहिजे— बरोबर ना?"

बरं डॉक्टरसाहेब, ह्या दोन गटांबद्दल तुम्हाला काय वाटते?

"सिंडीकेट जनतेपासून फार लांब आहे. इंदिरा गांधींनी केलेले राष्ट्रीयीकरण हा प्रपोगंडाचा भाग आहे. ठराव-घोषणा नेहमीच चांगल्या असतात. पण त्याचा प्रत्यक्ष अंमल पाहिजे. पण हे लोक जनतेला काही देणार नाहीत."

मध्येच पेशंट येत होते. डॉक्टरांचे उपचार चालूच होते. प्रत्येक पेशंटाची ते कुळकथा ऐकवत, दैन्य ऐकवत, थकलेली बिले दाखवत आणि डॉक्टरकी व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण जनतेच्या हिताकरिता कसे आवश्यक आहे, ते पटवून

विचारत – बराबर ना ? एक कप चहाच्या जोरावर आमची मुलाखत दोन तास चालली होती. मी उठलो – रस्त्यावर आलो. मला डॉक्टरांचे एक वाक्य सारखे आठवत होते–

“ गांधीजी देवस्वरूप होते. काँग्रेस गांधींच्या तत्त्वापासून दूर गेलीय. सध्याच्या काँग्रेस नेत्यांनी गांधींचा तमाशा बनवला – बराबर ना ? ”

□

“ हिंदुस्थानातल्या कोणत्याही राजकीय पक्षाला स्वतःच्या अस्तित्वाकरिता यापुढे समाजवादाची घोषणा करावीच लागेल. ” एल. आय. सी. वर्कर्सच्या युनियनचे एक क्रियाशील कार्यकर्ते श्री. ए. के. कारखानीस आपली मते मांडू लागले. त्यांच्यावर कोणत्याही एका विशिष्ट अशा पक्षाचा प्रभाव आढळला नाही.

“ मध्यावधी निवडणुका घेऊन ह्या दोन्ही गटांनी व इतरही साऱ्या पक्षांनी पुन्हा एकदा जनतेला सामोरे जावे. ” – कारखानीस सांगत होते – माझा स्वतःचा कोणत्याही गटाला सपोर्ट नाही. कारण सध्या काँग्रेसमध्ये–”

“ जे पोलरायझेशन. ”–मी.

“ पोलरायझेशन शब्द वापरू नका. ” कारखानीसांनी हरकत घेतली. “ काँग्रेसमध्ये पोलरायझेशन होत नसून स्प्लीट पडली आहे. तुम्हीच सांगा, स्वतःच्या कित्येक फर्मस असलेले, ज्याच्यावर लायसेन्स्प्रकरणावरून वादळ उठलेले आहे असे टी. टी. कृष्णम्माचारी हे गृहस्थ समाजवादी कसे असू शकतील ? सध्याची काँग्रेस ही जरी राष्ट्रपती निवडणुकीच्या तत्कालीन प्रश्नावरून फुटली असली तरी त्यामागे कोणतेही तत्त्वज्ञानात्मक अथवा संघटनात्मक कारण नसून व्यक्तिगत सत्तास्पर्धेतून हे तुकडे पडले आहेत. ” कारखानीस.

‘ मग तुमच्या मते आजची गरज काय ?”

“ मला वाटते, की राजकारण जास्त लोकाभिमुख व्हायला पाहिजे. सध्याचे सर्व पुढारी हे विशिष्टांचे हित पाहतात. त्यामुळे जनता आणि पुढारी यांच्यात अंतर पडले आहे. नवे नेतृत्व ही सर्व राष्ट्रीय पक्षांची गरज आहे. ”

“ बरे, छूरे कम्युनिस्ट आणि नक्षलवादी ? ”–मी.

“ जस्ट–ए मिनीट. ”–कारखानीसांनी मला मध्येच अडवले

“ नक्षलवादीच्या बाबतीत जयप्रकाशजींचे म्हणणे मला शंभर टक्के मान्य आहे. नक्षलवादी हे आजच्या राजकीय नेत्यांच्या वर्तणुकीचे फळ आहे. ”

“ अहो, पण त्यांचे तत्त्वज्ञान परदेशी आहे ! ”–मी.

“ हे पहा, तत्त्वज्ञान कोणतेही स्वकीय किंवा परकीय नसते आणि तसेच पाहिले, तर लोकशाही हे सुद्धा पाश्चिमात्यांचेच तत्त्वज्ञान आहे, नाही का ? आणि निदान मी तरी कम्युनिस्टांवर राष्ट्रद्रोहाचा शिक्का मारायला तयार नाही.

कारण शेवटी ते इथल्याच जनतेकरिता त्यांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे लढताहेत. माझ्या बोलण्यावरून मला कम्युनिस्ट तत्त्वज्ञान मान्य आहे असा गैरसमज करून घेऊ नका मला फक्त एवढाच आरोप करायचाय की – सध्याच्या राजकीय पुढाऱ्यांनी राष्ट्रभक्ती सवंग करून तिचे बुजगावणे केलें आहे. स्वतःच्या स्वार्थाप्रमाणे ते राष्ट्रभक्तीचे 'मेजरमेंट' करतात." आणि – एक समृद्ध मुलाखत संपली.

□

शासनसंस्थेतील प्रमुख घटकांना सद्यःपरिस्थितीविषयी काय वाटते हे अजमावण्याकरिता मी न्यायखात्यातील एका वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटलो. "दोन्ही गट गर्दीचे राजकारण खेळत आहेत. आपल्याकडे जनतेस पुरेसे राजकीय शिक्षण नसल्याने स्वस्त व पोकळ घोषणांनी जनतेचा पाठिंबा मिळवता येतो. आणि म्हणूनच दोन्ही गटांमध्ये घोषणांची शर्यत लागली आहे. पण ह्या गर्दीच्या राजकारणातून समाजाला काहीही 'पर्मनंट व्हॅल्युज्' मिळणार नाहीत हेही आपण लक्षात घ्यायला हवे."

"बरे समाजवादी घोषणांबद्दल तुम्हास काय वाटते ?"–मी.

"समाजवादाशिवाय देशाला तरणोपाय नाही. त्यादृष्टीने त्वरीत पावले उचलली जाणे आवश्यक आहे. बँक राष्ट्रीयीकरण स्वागतार्ह असले तरी ते बरेच व्हेग आहे. त्याचा जनतेला फायदा मिळाला पाहिजे. बँक कस्टोडियन हे हुकूमशहा होता कामा नयेत. तसेच तनखेबंदी त्वरीत अंमलात आणली पाहिजे. कारण समाजवादी रचने-करिता सरंजामशाहीची नावनिशाणी देखील पुसली पाहिजे."

"क्विट पॉव्हर्टी, आणि दहा कलमी ठराव ?"–मी.

"दहा कलमी कार्यक्रम फार अपुरा आहे. तरीसुद्धा धोरणात्मक दिशा म्हणून योग्य आहे; परंतु सध्या ज्या कॉंग्रेसांतर्गत पाठिंब्यावर इंदिरा सरकार अस्तित्वात आहे तो लक्षात घेता, हा दहा कलमी कार्यक्रमसुद्धा बराच महत्त्वाकांक्षी समजला पाहिजे. परंतु जोपर्यंत जनतेचे 'किचन-प्रॉब्लेम' त्वरीत सोडविण्यात येत नाहीत तोपर्यंत क्विट पॉव्हर्टीला नवीन घोषणा या पलीकडे फारसे विशेष महत्त्व प्राप्त होणार नाही."

"बरे, इंडिकेट गटाबद्दल तुम्हांला काय वाटते ?"–मी.

"ज्या गटकडे सत्ता असते तिकडे अर्थातच जास्त फॉलोइंग येते. आता ह्या घटकेस तरी बरेच संधिसाधू इंडिकेटमध्ये घुसले आहेत. आणि चव्हाणांचा पाठिंबा हा फार मोठा आधारस्तंभ होऊन बसला आहे. तरीपण सिंडीकेट नेत्यांनी सूड-बुद्धीचे धोरण स्वीकारण्याने जनतेची सहानुभूती ही इंडिकेटला मिळाली."

"बरे, ह्या राखीव जागांच्या मुदतवाढीमध्ये काही राजकारण आहे काय ?"–मी.

" राजकारण आहेच. पण मुदत वाढविणे हेही आवश्यकत होते. परंतु माझ्या-मते जोपर्यंत प्रत्यक्ष शासनात एखाद्या समाजास स्थान मिळत नाही तोपर्यंत तो समाज प्रगती करू शकत नाही. "

" ही तर मार्क्सिस्ट विचारसरणी झाली. "–मी.

" शक्य आहे. माझा स्वतःचा कम्युनिझमला विरोध नाही किंवा तो राष्ट्र-विरोधी आहे असेही मला वाटत नाही. फक्त मार्गाबद्दल मतभिन्नता आहे. "

" बंगाल आणि आंध्रमधील रक्तपाती उठावांबद्दल "–मी

" हिंसा आणि रक्तपात ह्याला माझा सदैव विरोध आहे. तरी सुद्धा ह्या उठावांना सरकारचे भांडवलदारी धोरणच जबाबदार आहे असे मला वाटते. "

एकंदरीत ब्रिटीश आमदानीत जन्मलेल्या आणि काँग्रेसी राज्यात वाढलेल्या चार आकडी पगाराच्या नोकरशहातदेखील जनतेच्या प्रश्नांचा आस्थेने विचार करणारे, थोडे का होईना, पण अधिकारी आहेत तर !

□

" जुन्या मूल्यांवरच्या निष्ठा उडाल्याने आणि नवीन निर्माण न झाल्याने तरुण पिढीत एक प्रकारचे ' वल्गर फ्रस्ट्रेशन ' दिसून येते. अशा फ्रस्ट्रेशनला क्रांतिकारक वृत्ती म्हणणे धाडसाचेच ठरेल नाही का ? "

एस. एन्. डी. टी. कॉलेजमधील प्राध्यपिका सौ. निला खोपकर ह्या विद्यार्थ्यांमध्ये वाढत असलेल्या मटकेबाजी आणि जुगारी प्रवृत्तीबद्दल बोलत होत्या. मी त्यांना विचारले, " ह्यावर उपाय काय ? "

" केवळ राजकीय किंवा आर्थिक जीवनात समाजवाद असून चालणार नाही. समाजवादी समाजाची नवीन नीतिमूल्ये आणि जीवनधारणा निर्माण करावी लागणार आहे. त्या दृष्टीने शंभर विचारवंतांची बैठक स्वागतार्ह असली तरी दहाकलमी कार्यक्रम फार निराशाजनक आहे. दहाकलमी कार्यक्रमामध्ये शिक्षण क्षेत्राबाबत काहीही राष्ट्रीय स्तरावरची योजना आखण्यात आलेली नाही समाज-वादी समाजरचनेत शिक्षण हे जीवनाचे एक अविभाज्य अंग होऊन बसते; परंतु आपणांकडे शिक्षण क्षेत्रातसुद्धा एक प्रकारची ब्युरॉक्रॅसी निर्माण होऊन बसली आहे. नेत्यांनी इकडे लक्ष देणे आवश्यक आहे. "

एका न चर्चिल्या गेलेल्या, उपेक्षित पण महत्त्वाच्या मुद्याला स्पर्श केल्याने मला काही तरी गवसल्यासारखे वाटले.

□ □ □

[ अनिल बर्वे यांनी घेतलेल्या आणखी काही मुलाखती पुढील अंकी ]



# अंदाज

पंडित वि. म जोशी
ज्योतिष विशारद

३१ जाने. ते ६ फेब्रु. १९७०

**मेष** : या सप्ताहातील ग्रहमान ता. ३–२–७० पर्यंत त्रासदायक आहे. त्यानंतर शुभफलदायक आहे. रवी १० वा, मंगळ ३ रा, बुध ९ वा, गुरू ७ वा, शुक्र १० वा, शनी उदरी व राहू ११ वा अशी ग्रहस्थिती आहे. रवी शुक्र–गुरू यांच्यावर शनी पाहतो आहे. त्याचे फळ चांगले मिळणार नाही. सरकारी व सहकारी कार्यात अपयश. गृहकलह होईल. फौजदारी खटले चालवणारे वकील, वाहातुकीच्या धंद्यातील कंत्राटदार, सर्जन, मेडिकल उपकरणांचा धंदा करणारे व त्यातील संशोधकांना यशदायी दिवस आहेत. विद्याभ्यासात अपयश व धननाश. फक्त सार्वजनिक कामात यश येईल. चंद्राचे भ्रमण पहिले दोन दिवस अष्टमातून आहे, त्यामुळे सुखहानी होईल. ता. ३ पासून आठवड्याच्या शेवटपर्यंत चंद्राचे भ्रमण भाग्य व दशमस्थानातून असून बुध, रवी–शुक्राशी योग होत आहे. त्यामुळे घरातील भांडणे बंद होतील. धनलाभ होईल. च, ल, र, त, अ या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील.

शुभ तारखा ३ व ६

**वृषभ** : या सप्ताहातील ग्रहमान नुकसानकारक आहे. शनी १२ वा, रवी – शुक्र ९ वे, भाग्यात बुध ८ वा, गुरू ६ वा, राहू दशमात, मंगळ ११ वा. या राशीला मालायोग झाला आहे. तो चांगला आहे. धन-यशप्राप्ती, मानमरातब मिळेल. विशेषतः चालू वय ४२ च्या पुढे असलेल्या सार्वजनिक कार्यकर्त्यांना चांगले यश मिळेल. चंद्राचे भ्रमण ७, ८ व ९ या घरातून आहे. ता. ३–४ हे दिवस अचानक धनलाभ करून देणारे आहेत. ता. ५–६ सरकारी कामात– कोर्टात यशदायी आहेत. विद्यार्थ्यांना विद्याभ्यासात अपयश, मेडिकलच्या विद्यार्थ्यांना शुभफलदायी आहे. त्याचप्रमाणे ता. ५–६ ला २७ ते ३२ वयातील तरुण प्रेमप्रकरणात गुंततील. व्यसनाधीन माणसे जास्त उन्मत्तपणाने वागतील. न, य, व, ब आणि सर्व स्वरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांनाही अशीच फळे मिळतील.

शुभ तारखा १, २, ५, ६

**मिथुन** : या सप्ताहातील ग्रहमान धनप्राप्ती करून देणारे आहे. रवी–शुक्र ८ वे,

बुध ७ वा, राहू ९ वा, मंगळ १० वा व शनी ११ वा, गुरू ५ वा असे सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. पत्नी व भागीदाराकडून मदत होईल. जीवन सुखमय होईल. भावंडांकडून व संततीकडून त्रास होईल. अचानक धनलाभ होईल. पहिले दोन दिवस चंद्राचे भ्रमण सहाव्या घरातून आहे. सासऱ्याकडून अगर मातुळ घराण्यातील व्यक्तींकडून थोडासा त्रास होईल. ता. ३–४ सर्व बाजूंनी चांगल्या जातील. घरात आनंदमय वातावरण होईल. कोर्टाची कामे पुढे टाकावी. फॅन्सी वस्तूंच्या व्यापाऱ्यांची थोडी कुचंबणा होईल. विद्यार्थ्यांना व लेखकांना दिवस चांगले जातील. ३२ ते ३६ वयातील लोकांच्या बऱ्याच दिवसाच्या आकांक्षांना दृश्यफल येईल. घराचे व्यवहार ता. ३–४ ला पुरे करावे. क, प, द, ध, च, फ, झ, ज्ञ, भ, घ, थ या अक्षरांनी नावे सुरू असलेल्या व्यक्तींनाही वरील फळे मिळतील.

शुभ तारखा ३, ४, ५, ६

**कर्क** : या सप्ताहातील ग्रहमान धनदायक आहे. रवी-शुक्र ७ वे, राहू ८ वा, मंगळ ९ वा, शनी १० वा, गुरू ४ था, बुध ६ वा. शत्रूंचा त्रास होईल. विद्याभ्यासात यश येईल. सर्जन्सना दिवस फार चांगले आहेत. मधुमेहाचा विकार अगर मूत्रदोष निर्माण होईल. दशमातील शनीमुळे वाईट धंद्यात भागीदारांकडून अचानक धनलाभ होईल. सरकारदरबारी यश येईल. चतुर्थातील गुरू सर्व अडचणीतून पार पाडील. चंद्राचे भ्रमण ५, ६ व ७ व्या घरातून आहे. सर्व आठवडा शुभफलदायी आहे. पहिले दोन दिवस विद्यार्थ्यांना चांगले आहेत. ३–४ तारखांना सार्वजनिक कामात यश येईल. सार्वजनिक कामाकरिता ता. ५–६ ला प्रवासयोग येईल. सिंडिकेटचे काम जोरात पुढे जाईल. प्रसाधनांच्या व्यापाऱ्यांना व फॅन्सी वस्तूंच्या व्यापाऱ्यांना नवीन विक्रेते (Agent) मिळून त्यांच्यामार्फत अमाप फायदा होईल. यंत्राचे कारखाने आपल्या कामात प्रगती करतील. ज, स, ख, ह, ड या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू आहेत त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील.

शुभ तारखा ३, ४, ५, ६

**सिंह** : या सप्ताहातील ग्रहमान पीडादायक आहे. सप्तमात राहू, अष्टमात मंगळ, नवमात शनी, सहाव्या घरात रवी–शुक्र व तृतीयात गुरू असे ग्रह आहेत. एकच एक राजयोगकारक ग्रह मंगळ अष्टमात राहू–शनीच्या कात्रीत आहे. तो सुखाला व भाग्याला कमीपणा आणील. प्रवासाला जाण्याचा बेत रद्द करावा. घराचे अगर जमिनीचे व्यवहारात नुकसान होईल. स्वभावातील हट्टीपणा वाढेल. एकच शुभयोग आहे तो म्हणजे रवी–शुक्र सहाव्या घरात. रवी लग्नेश षष्ठात आहे. हा पराक्रम योग असतो. शिवाय शुक्र दशमेश तृतीयेश सहाव्या घरात आहे. आयत्यावेळी मामा अगर सासऱ्याकडून मदत होऊन संकटमुक्त व्हाल. सिंह राशीची माणसे अत्यंत महत्त्वाकांक्षी असतात. चंद्राचे भ्रमण ४, ५, ६ स्थानातून आहे. ते बरे आहे. पहिले दोन दिवस घरात आनंदीआनंद होईल. येणे असलेले अचानक ता. ३–४ ला येईल.

व ता. ५–६ ला कोर्टाच्या कामात यश येईल. ग, श म, ट, ठ या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू आहेत त्यांनाही हीच फळे मिळतील.

**कन्या** : या सप्ताहातील ग्रहमान सौख्यदायक आहे. धनस्थानात गुरू, चतुर्थात बुध, पंचमात रवी–शुक्र, षष्ठात राहू, सप्तमात मंगळ व अष्टमात शनी असे सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. धनलाभ चांगला घडेल. चतुर्थातील बुध दशमेश आहे. व शिवाय भाग्येश शुक्र पंचमात आहे. हातून लिखाण होईल. गृहसौख्य चांगले लाभेल. मानमान्यता मिळेल. सहाव्या घरातील राहू व आठव्या घरातील शनी शत्रूनाश घडवून आणील. सरकारी व सहकारी कामात यश मिळेल. सरकारातून येणारी असलेली रक्कम हातात पडेल. संततीशी पटणार नाही. भागीदार व पत्नीशी मतभेद होईल. चंद्राचे भ्रमण तीन, चार व पाचव्या घरातून होत आहे. ते चांगले आहे. मित्राकडून मदत होईल. पराक्रमाला वाव मिळेल. क, प, द, ध, च या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील.

**तूळ** : या सप्ताहातील ग्रहमान शुभफलदायी आहे. लग्नी गुरू, तिसऱ्या घरात बुध, चतुर्थात रवी–शुक्र, पंचमात राहू, सहाव्या घरात मंगळ, सप्तमात शनी असे सर्व ग्रह यशदायी आहेत. विद्याभ्यासात यश येईल. ३२ ते ३६ वयाच्या व्यक्तींना प्रवासाचा योग येईल. भाग्योदय होईल. अचानक धनलाभ निश्चित होईल. या राशीची माणसे दोन टोकाची असतात. त्यात राम आहे व रावणही आहे. या आठवड्यात कोर्टकचेरीची कामे यशदायी होतील. फॅन्सी वस्तूंच्या व्यापाऱ्यांना फायदा होईल. पत्नी व भावंडांकडून व्यवसायात मदत होईल. भागीदार थोडेसे भांडतील. ता. ३१ ला अचानक धनलाभ होईल. चंद्राचे भ्रमण दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या घरातून होत आहे. ते शुभ आहे. ता. १।२ धनदायक जातील. ता. ३।४ ला व्यवहाराची बोलणी होतील. शास्त्रीय लिखाण हातून होईल. ५।६ तारखांना घरात काहीतरी धनलाभाच्या शुभ वार्तेने आनंदीआनंद पसरेल. मित्रांकडून व वडील माणसांकडून मदत होईल.

शुभ तारखा ३।४।५।६

**वृश्चिक** : या सप्ताहातील ग्रहमान तापदायक आहे. हातून चुका होतील व त्याबद्दल पश्चात्ताप करावा लागेल. व्ययात गुरू, धनस्थानात बुध, तिसऱ्या घरात रवी–शुक्र, चतुर्थात राहू, पंचमात मंगळ व सहाव्या घरात शनी. विद्याभ्यासात अपयश येईल. धनप्राप्ती होण्याला अनेक अडचणी येतील. स्वतःच्या कर्तबगारीवर जास्त विश्वास ठेवून केलेल्या कामात मानहानी होईल. मधुमेहासारखे रोग असतील ते वाढतील. ३१ तारीख फारच त्रासदायक जाईल. चंद्राचे भ्रमण एक, दोन व तीन अशा घरातून होत आहे. ता. १।२ ला काही पाहुणे घरी येतील, व ते शुभ बातमी आणतील. ता. ३।४ ला धनयोग आहे. येणारे पैसे आपोआप येतील. ता. ५।६ ला

घरात काही तरी शुभ कार्याचे बेत होतील. लग्नाचे योग येतील. भागीदाराकडून फसगत होईल. सरकारी कामात अपयश येईल. सार्वजनिक कामात यश मिळेल. न, य, व, व या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू आहेत त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा ३।४।५।६

**धन** : या सप्ताहातील ग्रहमान भोगकारक आहे. लग्नी बुध, धनात रवी–शुक्र, तृतीयात राहू, चतुर्थात मंगळ व पंचमात शनी असे सर्व ग्रह सेवेला व मदतीला हजर आहेत. बुध सप्तमेश व दशमेश लग्नी आहे. विवाहाची मागणी येईल. भागीदारांच्या मदतीने प्रतिष्ठा वाढेल. स्त्रियांना प्रेमप्रकरणात यश मिळेल. धनलाभ चांगला होईल व त्यामुळे मानमान्यता मिळेल. कलेत यश मिळेल. गायन चित्रकला व सर्जरी यात फारच प्रसिद्धी मिळेल. घराबद्दलच्या वाटाघाटी पुऱ्या होतील. ता. १।२ ला चंद्राचे भ्रमण बाराव्या घरातून आहे. त्या दिवशी थोडीशी मनःशांती ढळेल. ता. ३।४।५।६ या सर्व तारखा प्रत्येक बाबतीत यशदायी आहेत. ता. ३।४ ला विवाहाची बोलणी करावी. ता. ५।६ ला अचानक धनलाभाचे व मान वाढविणारे व्यवहार पुरे करावे. ज्यांची नावे क, भ, ध, घ, थ, छ या अक्षरांनी सुरू होत असतील त्यांनाही वरील फळे मिळतील.

शुभ तारखा ३।४।५।६

**मकर** : या सप्ताहातील ग्रहमान अस्थिरता निर्माण करणारे आहे. प्रवासयोग येईल. लग्नी रवी–शुक्र, धनात राहू, तिसऱ्या घरात मंगळ, चतुर्थात शनी, व्ययात व दशमात गुरू अशी ग्रहांची मांडणी आहे. धननाश, सुखनाश होईल. भावंडांशी व मित्रांशी मिळते घेण्याचा प्रयत्न करावा. राग आवरणे जरूर आहे. प्रवासयोग येईल तो टाळावा. विद्याभ्यासात अपयश. एकच एक चांगला योग म्हणजे दशमातील गुरू. तो या सर्व कुयोगाचे फळ शक्यतो कमी करण्याचा प्रयत्न करील. विशेषतः ५।६ तारखांना सर्व अडचणीतून सुटका होईल. ता. ३१।१।२ या चांगल्या जातील. या राशीची माणसे भाग्यवान असतात. त्यांचा भाग्योदय वयाच्या ३६ च्या पुढे होतो. तो मात्र शेवटपर्यंत. चंद्राचे भ्रमण पहिले तीन दिवस चांगले आहे. ज, स, ख, ह, ड या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू आहेत त्यांनाही वरील फळे मिळतील.


शुभ तारखा ३१।१।२।५।६

**कुंभ** : या सप्ताहातील ग्रहमान शुभफलदायी आहे. १ ला राहू, २ रा मंगळ, ३ रा शनी, ९ वा गुरू, ११ वा बुध, व बारावे रवी – शुक्र. धनलाभ चांगला होईल. सार्वजनिक कामात मानमान्यता वाढेल. वृद्धियुक्त व्यवसायाकरिता प्रवास-

योग येईल. मित्रांकडून व संततीकडून सर्व बाबतीत मदत होईल. भागीदार व पत्नी थोडेसे विरुद्ध जातील; पण तो विरोध कल्याणाकरिताच आहे. स्वभावात हट्टीपणा वाढेल. रागावर आळा घालावा. दररोज शंकराचे दर्शन घ्यावे. चंद्राचे भ्रमण पहिले पाच दिवस उदय गोलार्धातून भाग्य, दशम व एकादशातून आहे, ते फार चांगले आहे. मानसन्मान देणारे आहे. सरकार–दरबारची कामे पुढे ढकलावी. स्थावराबद्दलचे व्यवहार पुढे ढकलावे. या राशीची माणसे आत्मघातकी असतात. त्यांना सगळे जग चांगले वाटते; पण घरची माणसे अगर नातलग यांच्याबद्दल त्यांना आपलेपणा नसतो. ग, श, म, ट, आणि ठ या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांना वरीलप्रमाणे फळे मिळतील.

शुभ तारखा ३१।१।२।३।४

**मीन** : या सप्ताहातील ग्रहमान सुखदायक आहे. लग्नी मंगळ, धनात शनी व्ययात राहू, एकादशात रवी – शुक्र, दशमात बुध व अष्टमात गुरू. यापैकी अष्टमातील गुरू हा वाईट आहे. त्याच्यासमोर शनी. धननाश, वाचाशुद्धी कमी होणे. १०।११।१२।१ या घरांचे अधिपती समोरासमोर आहेत. हा योग चांगला आहे. पण त्यांना स्थानबल नाही. प्रत्येक गोष्ट – विशेषत: धनप्राप्ती अग्नी दिव्यातून जाऊन मग प्राप्त व्हावयाची. रवी–शुक्र व बुध फारच शुभ आहेत. ते भाग्योदय घडवतील. बौद्धिक व सरकारी कार्यकर्त्यांना यश मिळेल. मेडिकल स्टोअर्स, रेडीमेड फॅन्सी कपड्यांचे दुकानदार, रंगाचे व्यापारी, चित्रकार, कलाकार यांना आठवडा फार चांगला आहे. ता. ३१ ला संतती विरोध करेल. विद्येत अपयश येईल. बाकी सर्व आठवडा चंद्राचे भ्रमण ९।१०।११ या घरातून अत्यंत शुभफलदायी आहे. मनातील सर्व हेतू पुरे होतील. क, प, द, फ, झ, ञ या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू आहेत त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H-649

मार्चचा दुसरा आठवडा उगवला. संध्याकाळची प्रार्थना उपासनाभूमीऐवजी साबरमतीच्या आश्रमात होऊ लागली. हजारो माणसे प्रार्थनेला येत होती. अकरा मार्चला प्रार्थना संपली तरी कोणी घरी जायचे नाव काढेना. रात्रभर माणसांची रीघ लागली होती. गांधीजींच्या बरोबर जाणाऱ्या एकूणऐंशी जणांनाही 'माहात्म्य' प्राप्त झाले होते.

अगदी ठरल्याक्षणी गांधीजींनी आश्रमाच्या बाहेर पाऊल टाकले...ती काठी...ते प्रसन्न हास्य...त्यांच्यामागून ते सहकारी...

तो सारा इतिहास माझ्या डोळयापुढून हलत नव्हता...

'साबरमती' कंडक्टर ओरडला. मी जागा झालो.

# मौजे गांधीनगर

लेखांक पाच

श्री. ज. जोशी

पुढील अंकी